मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ,मुंबई
मंगळवार दिनांक ०४/०६/२००२ रोजी झालेल्या ७८ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत

मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाची ७८ वी बैठक मंगळवार दि.०४/०६/२००२ रोजी संध्याकाळी ५.०० वा. गृहनिर्माण भवनातील तिस-या मजल्यावरील गुलझारीलाल नंदा सभागृह येथे संपन्न झाली. सदर बैठकीस खालील मान्यवर उपस्थित होते.

१.	मा.आमदार श्री.सचिन भाऊ अहिर	सभापती
२.	श्री.एस्.एस्.झेंडे	मुख्य अधिकारी
३.	मा.श्री.सचिन मा.सावंत	सदस्य
४.	मा.श्री.विश्वास मोकाशी,	सदस्य
५.	मा.श्री.गजेंद्र लष्करी	सदस्य
६.	मा. श्री. रघुनाथ थवई	सदस्य
७.	मा.श्री. कमरुद्दीन मर्चंट	सदस्य
८.	मा.श्रीमती छाया कल्याणी	सदस्या
९.	मा.श्री.रमेश परब	सदस्य
१०.	मा. श्री उस्मान गणी कुरेशी (लालीभाई)	सदस्य
११.	मा.श्री.मोहन देसाई	सदस्य
१२.	मा.श्री.बाप्पा सावंत	सदस्य
१३.	मा. श्री. संजय शिर्के	सदस्य
१४.	मा. श्री. अबुबकर मूसा बाटलीवाला	सदस्य
१५.	प्रमुख अभियंता, म.न.पा. हयांचे प्रतिनिधी	निमंत्रक
१६.	कर निर्धारक व संकलक, म.न.पा. यांचे प्रतिनिधी	निमंत्रक

बैठकीच्या सुरवातीस मा. सभापती हयांनी उपस्थित सर्व सन्मा. सदस्य व अधिकारी / कर्मचारी वर्गाचे स्वागत करुन सचिवाना बैठकीस सुरवात करण्याच्या सूचना दिल्या. तद्नुसार सचिवांनी बैठकीस सुरवात केली.

बाब क्रमांक : ७८/१

विषय- **दि.०४.०५.२००२ रोजी संपन्न झालेल्या मंडळाच्या ७७ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत स्थायी करण्याबाबत.**

मुं.इ.दु. व पु. मंडळाच्या दि. ०४.०५.२००२ रोजी संपन्न झालेल्या ७७ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत स्थायी करण्यासाठी पृ.क्र.१ ते ५५ वर सादर करण्यात आला आहे.
सविस्तर चर्चेअंती सदर कार्यवृत्तांत सर्वानुमते स्थायी करण्यात आला.

....

बाब क्रमांक : ७८.२ (१)

विषय- **नियंत्रण कक्षात प्राप्त झालेल्या संदेशाची माहिती.**
कालावधी दि. ३.५.२००२ ते दि. २८.५.२००२.

दि. ३.५.२००२ ते दि. २८.५.२००२ हया कालावधीमध्ये उपकरप्राप्त इमारतींच्या पडझडीबाबत नियंत्रण कक्षात प्राप्त झालेल्या संदेशांची माहिती पृ.क्र.५७ वर सादर करण्यात आली आहे.

मा. सदस्य, श्री गजेंद्र लष्करी हयांनी हयाबाबत असे निदर्शनास आणून दिले की, डी. वॉर्डातील धसवाडी हया ठिकाणी झालेल्या इमारतीच्या पडझडीमध्ये दोन-तीन कामगार जखमी झाले असून त्याबाबत पोलीस विभागाकडून कार्यवाही चालू आहे. हया इमारतीच्या पुनर्विकासासाठी आपण नुकतेच ना.ह.प्र. पत्र दिले आहे. विकासकाने इमारत पाडताना कोणतीच खबरदारी घेतलेली नव्हती. मात्र वर्तमानपत्रामध्ये असे छापून आले की, मंडळाच्या निष्काळजीपणामुळे हा अपघात झाला आहे.

मा. सदस्य, श्री विश्वास मोकाशी हयांनी हयाबाबत असे प्रतिपादन केले की, आपण जरी या इमारतीच्या पुनर्विकासासाठी विकासकास ना.ह.प्र. पत्र दिले असले तरी, त्याबाबतची नैतिक जबाबदारी म्हणून रहिवाशी मंडळाकडे बोट दाखवितात. पुनर्विकासासाची योजना नेमकी काय आहे हयाबाबत रहिवाशांना माहिती नसते.

सचिव तथा नि.का.अ./दुवपु मंडळ हयांनी हयाबाबत असे प्रतिपादन केले की, पुनर्विकासाच्या प्रस्तावांमध्ये ७० टक्के रहिवाशांची संमतीपत्रे सादर केल्यानंतर आपण पुनर्विकासासाठी ना.ह.प्र. पत्र प्रदान करतो. हे प्रकरण " लंके बिल्डिंग " हया इमारतीच्या पुनर्विकासाबाबतचे असून आपण पुनर्विकासासाठी ना.ह.प्र. पत्र दिलले आहे. ही इमारत पाडण्याचे काम चालू असताना योग्य ते निरिक्षण केले गेले नसावे तसेच मंडळाचा हया प्रकरणी प्रत्यक्ष संबंध नसतो.

हयाबाबत मा. सदस्य, श्री गजेंद्र लष्करी हयांनी अशी विचारणा केली की, हया प्रकरणाशी मंडळाचा जर प्रत्यक्ष संबंध नाही तर पडझडीचा संदेश नियंत्रण कक्षास कसा प्राप्त झाला. तद्नुषंगाने सचिव तथा नि.का.अ./दुवपु हयांनी असा खुलासा केला की, आपण हया प्रकरणी ना.ह.प्र. पत्र प्रदान केले असल्याने विकासक ही जूनी इमारत स्वतः पाडत असून पुनर्रचित करणार आहे. त्यामुळे हयाबाबतची सर्व जबाबदारी विकासकाची आहे.

का.अ./डी-१ विभाग श्री सेहगल हयांनी हयाबाबत असे प्रतिपादन केले की, अपघातानंतर हया इमारतीची पाहणी त्यांनी स्वतः केली आहे. हया इमारतीचा क्रमांक ६-८, धसवाडी असून ती पाडण्याचे काम विकासकामार्फत चालू असताना इमारतीचा काही भाग पडून त्यामध्ये तीन कामगार जखमी झाले होते. हया तीन जखमी कामगारांना रुग्णालयात दाखल करुन औषधोपचारानंतर सोडून देण्यात आले. इमारत पाडण्याचे काम योग्य रितीने केले जात नसल्याने हा अपघात झाला असावा. हयाबाबत योग्य ती खबरदारी घेण्याबाबत विकासकास सूचना देण्यात आल्या आहेत.

हयाबाबत मा. सदस्य, श्री गजेंद्र लष्करी हयांनी असे प्रतिपादन केले की, ज्या तीन जखमी कामगारांबाबत हा प्रकार घडला तसाच प्रकार सर्वसामान्य जनतेबाबतही होऊ शकतो. अपघातावेळी जर हया इमारतीच्या बाजूने काही व्यक्ती पदपथावरुन ये-जा करीत असत्या तर त्या व्यक्तीही जखमी

झाल्या असत्या. वर्तमानपत्रामधून हा अपघाताचा ठपका मंडळावर ठेवला असल्याने त्याबाबत हया अपघातास मंडळ जबाबदार नसून विकासकाच्या चुकीमुळे हा अपघात झाल्याचा सविस्तर खुलासा मंडळाने वर्तमानपत्रामध्ये त्वरित प्रसिध्द करावयास हवा होता.

मुख्य अधिकारी हयांनी हयाबाबत वर्तमानपत्रामध्ये खुलासा देण्यास संबंधित अधिका-यांना सूचना देऊन असे प्रतिपादन केले की, मा. उच्च न्यायालयाने खेतवाडी येथील श्री बंकीम दलाल हयांच्या पुनर्विकास योजनेच्या अनुषंगाने दिलेल्या आदेशानुसार मंडळाने पुनर्विकासास जरी ना.ह.प्र. पत्र प्रदान केले असले तरी, पुनर्विकास योजनेंतर्गत बांधल्या जाणा-या इमारतीत जुन्या इमारतीतील रहिवाशांचे पुनर्वसन होईपर्यंत मंडळाची आर्थिक जबाबदारी नसली तरी नैतिक जबाबदारी आहे. मा. उच्च न्यायालयाच्या सदर आदेशांच्या अनुषंगाने शासन स्तरावर त्याबाबत मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्याची कार्यवाही चालू असून लवकरच हया मार्गदर्शक सूचना विभागीय कार्यालयांस प्राप्त होतील.

सविस्तर चर्चेअंती विषयांकित माहितीची सर्वांनी नोंद घेतली.

....

बाब क्रमांक : ७८.२ (२)

विषय- **निविदा स्विकृतीबाबत अनुपालन अहवाल.**

१) इ.क्र.४९-४९ए व ५१-५३, के.के.मार्ग, ई.विभाग हया इमारतीच्या पुनर्बांधणी योजनेच्या निविदा स्विकृत करण्याबाबत.

२) इ.क्र.८६-१०६ व ९४-ए, टी.बी.कदम झेनाब बिल्डिंग हया इमारतीच्या पुनर्बांधणी योजनेच्या निविदा स्विकृत करण्याबाबत.

विषयांकित अनुपालन अहवाल पृ.क्र.५९ ते ६१ वर सादर करण्यात आला आहे.

विषयांकित अनुपालन अहवालावर चर्चा होऊन सदर अहवालास सर्वानुमते मान्यता देण्यात येऊन सदर अनुपालन अहवालाची नोंद सर्वानुमते घेण्यात आली.

....

बाब क्रमांक : ७८.३

विषय- **मुं.इ.दु.व पु.मंडळातर्फे मुंबई शहर बेटावरील जुन्या व मोडकळीस आलेल्या उपकरप्राप्त व भूसंपादित इमारतींच्या सन २००२ च्या पावसाळयापूर्वीच्या सर्वेक्षणात आढळलेल्या धोकादायक इमारतींची यादी.**

मुंबई शहर बेटावरील जुन्या व मोडकळीस आलेल्या उपकरप्राप्त व भूसंपादित इमारतींच्या सन २००२ च्या पावसाळयापूर्वीच्या सर्वेक्षणात आढळलेल्या धोकादायक इमारतींची यादी पृ.क्र.६३ ते ६७ वर माहितीसाठी सादर करण्यात आली आहे.

हयाबाबत मा.सभापती हयांनी असे प्रतिपादन केले की, सन २००२ च्या पावसाळयापूर्व सर्वेक्षणात आढळलेल्या मुंबई शहरातील धोकादायक इमारतींची पाहणी त्यांनी व सन्मा. सदस्यांनी केली आहे. हया पहाणीमध्ये असे आढळून आले की, मंडळाच्या अभियंतावर्गाने उपकरप्राप्त इमारतींचे

सर्वेक्षण अतिशय चांगल्या पध्दतीने केले असून त्याबाबत मा.सभापती महोदयांनी समाधान व्यक्त केले. मुंबई शहरातील एकूण २१ उपकरप्राप्त इमारती धोकादायक म्हणून घोषित केल्या आहेत. पूर्वानूभव लक्षात घेता धोकादायक इमारतींच्या यादींमधील इमारतींचे अपघात न होता इतर इमारतींची पडझड होते . हयावेळी असा प्रकार होणार नाही हयाबाबत संबंधितांनी काळजी घ्यावी तसेच अपघातसदृश्य परिस्थितीमध्ये वापरल्या जाणा-या आपल्या ज्या अत्यावश्यक सेवा व तांत्रिक सामुग्री आहे हयांची चोख व्यवस्था ठेवण्यात यावी. नियंत्रण कक्षाचा दूरध्वनी क्रमांक दूरचित्रवणीवरुन वारंवार दाखविण्यात येऊंन उपकरप्राप्त इमारतींच्या पडझडीबाबत नियंत्रण कक्षास त्वरित संपर्क साधण्याचे आवाहन रहिवाशांना करावे जेणेकरुन रहिवाशी निमंत्रण कक्षाशी त्वरित संपर्क साधू शकतील.

मा. सदस्य, श्री विश्वास मोकाशी हयांनी हयाबाबत अशी विचारणा केली की, इमारतीचा बहुतांश भाग धोकादायक असेल तर अशी इमारत धोकादायक इमारतींच्या यादीमध्ये समाविष्ट करतो. परंतु एखाद्या इमारतीचा फक्त २५ टक्के भागच अतिशय धोकादायक असेल किंवा सर्वसाधारणतः फक्त सामाईक शौचालयाचा भाग धोकादायक असेल तर अशा इमारतींचाही समावेश आपण धोकादायक इमारतींच्या यादीमध्ये करतो का? पाहणीमध्ये आढळल्यानुसार धोकादायक भागास टेकू लावणे, धोकादायक भाग पाडून घेणे इ. अनुषंगिक कार्यवाही आपण त्वरित करणे आवश्यक आहे.

उपमुख्य अभियंता (द.) श्री भूवनदास हयांनी हयाबाबत असे मत प्रदर्शित केले की, इमारत धोकादायक ठरविताना तिचा किती टक्के भाग धोकादायक आहे हयावरुन ती इमारत धोकादायक इमारतींच्या यादीमध्ये समाविष्ट केली जात नाही. एखाद्या इमारतीचा फक्त २५ टक्के भाग त्वरित पाडून उर्वरित भाग सुस्थितीत असेल तर अशी इमारत धोकादायक इमारतींच्या यादीत समाविष्ट करावयाची किंवा नाही याबाबत परिस्थितीनुरुप निर्णय घ्यावा लागतो. ब-याच वेळा इमारत संकृतदर्शनी सुस्थितीत असल्याचे तिच्या बाहय निरिक्षणावरुन आढळते. मात्र अशा इमारतीचे संरचनात्मक भाग आतून किती प्रमाणात खराब झाले आहेत हयाची पाहणी करता येत नाही. ब-याचवेळा इमारतीच्या धोकादायक भागास लावण्यात आलेले टेकू रहिवाशी त्यांच्या सोयीनुसार हलवितात. काही इमारतीत खोल्यांमध्ये असलेल्या फॉल्स सिलिंगमुळे त्याच्या आतील छताची पाहणी करणे शक्य हेत नाही. दोन इमारतीतील अरुंद गल्ल्यातील कच-यामुळे इमारतीच्या त्या भागांची पाहणी करता येत नाही. सर्वेक्षणात आढळलेल्या धोकादायक इमारतींबाबत, अनुषंगिक कार्यवाही, जसे धोकादायक भागास टेकू लावणे, धोकादायक भाग पाडणे, रहिवाशांना संक्रमण शिबीरात स्थलांतरित करणे इ. युध्दपातळीवर केली जाते.

मा. सदस्य श्री मोहन देसाई हयांनी हयाबाबत असे मत प्रदर्शित केले की, मा. सभापती व सन्मा. सदस्यांसमवेत जेव्हा धोकादायक इमारतींची पाहणी करण्यात आली तेव्हा असे निदर्शनास आले की, काही इमारतीत इमारत मालक व रहिवाशांमध्ये मतभेद आहेत. परंतु कोणीही मंडळाच्या कार्यपध्दतीला दोष दिलेला नाही.

वरील प्रदीर्घ चर्चेनंतर मा. सदस्य श्री रघुनाथ थवई हयांनी सर्व सन्मा. सदस्य व मा. सभापती महोदय हयांच्यावतीने मंडळाच्या सर्व संबंधित अधिक-यांचे अभिनंदन केले.

बाब क्रमांक :७८/४

विषय- **संक्रमण शिबीरातील गाळे वितरण कार्यपध्दती.**

....

सदर प्रस्ताव पृ.क्र.६९ ते ७१ वर सादर करण्यात आला आहे.

उपमुख्य अधिकारी (सं.शि.) श्रीमती पुगांवकर हयांनी याबाबत असे प्रतिपादन केले की, विषयांकित बाब टिपणीत सादर केल्यानुसार संक्रमण शिबीरांमध्ये एकूण २१७४६ गाळे असून २०५९० गाळयांचे वितरण केलेले आहे. ५७० गाळयांमध्ये घुसखोर व्यक्ती आहेत. १३६६३ गाळे उपकरप्राप्त इमारतीतील रहिवाशांना वितरीत केले असून एस.आर.ए. योजनेंतर्गत ६२१४ गाळे ना.ह.प्र.पत्रधारकांस वितरीत केले आहेत. सेवानिवासस्थान म्हणून, ३१२ गाळे वितरीत केले असून इतर संस्थांना १९७ व एस.आर.पी.साठी जयकोच येथे २२४ गाळे वितरीत केले आहेत.

कार्यकारी अभियंत्यांकडून संक्रमण शिबीरातील गाळे वितरणाचा प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर त्याची तपासणी करुन पात्र व्यक्तीस संक्रमण शिबीरातील गाळयांचे वाटप केले जाते. टिपणीत सादर केल्यानुसार संक्रमण शिबीरांच्या गाळे वाटपाबाबत काही त्रुटी असतील तर त्याबाबत सुधारित पध्दती ठरविण्याबाबत उपमुख्य अधिकारी (सं.शि.) हयांनी मंडळास विनंती केली.

मा. सदस्य, श्री विश्वास मोकाशी हयांनी हयाबाबत अशी विचारणा केली की, सध्याच्या गाळेवाटपाच्या पध्दतीत काय सुधारणा करावी हे सन्मा. सदस्यांना विचारण्यापेक्षा उपमुख्य अधिकारी (पु.गा.) हयांनीच सुधारित पध्दती सुचवावी जेणेकरुन त्याबाबत चर्चा करुन निर्णय घेणे सुलभ होईल.

तदानुषंगाने उपमुख्य अधिकारी (सं.शि.) हयांनी असे प्रतिपादन केले की, संक्रमण शिबीरातील गाळयांची संख्या खूपच कमी असून त्यांची अवस्थाही खूपच खराब आहे. ब-याचदा रहिवाशी त्यांना वाटप केलेला गाळा न स्विकारता अन्य गाळयांची मागणी करतात. त्यामुळे प्रत्येकास त्यांच्या आवडीच्या गाळयांचे वितरण करणे शक्य होत नाही.

मा.सदस्य श्री सचिन सावंत हयांनी हयाबाबत असे प्रतिपादन केले की, उपमुख्य अधिकारी (सं.शि.) हयांनी फक्त संक्रमण शिबीरातील गाळयांच्या आकडेवारीची माहिती दिलेली आहे. संक्रमण शिबीरातील गाळे वितरणाच्या पध्दतीत होत असलेले गैरप्रकार, संक्रमण शिबीरातील गाळे वाटपासाठी रहिवाशांना दिवसभर ताटकळत उभे ठेवणे, त्यांना योग्य ती माहिती न देणे हयाबाबतची माहिती देणे आवश्यक आहे. तसेच गाळे वाटपासाठी प्राप्त झालेल्या प्रस्तावांची कशाप्रकारे छाननी करण्यात येते, गाळे वाटपासाठी पात्र व्यक्ती कशाप्रकारे ठरवितात हयाबाबतची माहिती अभिप्रेत आहे.

मुख्य अधिकारी/दुवपु मंडळ हयांनी हयाबाबत असे प्रतिपादन केले की, मा.सदस्य श्री सचिन सावंत हयांच्या मताशी ते पूर्ण सहमत असून गाळे वाटपासाठी २-३ तास किंवा दिवसभर रहिवाशांना ताटकळत ठेवणे किंवा त्यासाठी वारंवार कार्यालयात खेपा घालण्यास लावणे योग्य नाही. गाळे वाटपाचे अधिकार हे उपमुख्य अधिकारी (सं.गा.) हयांच्याकडे असल्याने गाळे वाटपाचा निर्णय अर्ध्या ते एक तासात होण्यास काहीच हरकत नसावी.

मा.सदस्य श्री रमेश परब हयांनी असे प्रतिपादन केले की, संक्रमण शिबीरातील गाळे वाटपासाठी संपूर्ण दिवस जातो. तसेच मा.सदस्य श्री मोहन देसाई हयांनी हयाबाबत अशी विचारणा

केली की, बाब टिपणीत नमूद केलेले इतर संस्थांसाठीचे गाळे म्हणजे इतर खर्चाप्रमाणे नाही ना ? तसेच मा.सदस्य श्री बाप्पा सावंत हयांनी हयाबाबत अशी विचारणा केली की, बाब टिपणीत सेवा निवासस्थान म्हणून दाखविलेले गाळे हयाचा अर्थ काय आहे?

मिळकत व्यवस्थापक (सं.गा.) हयांनी याबाबत असा खुलासा केला की, प्राधिकरणातील काही कर्मचा-यांना संक्रमण शिबीरातील गाळे सेवानिवासस्थान म्हणून वितरीत केलेले आहेत. तद्नुषंगाने मा.सदस्य श्री बाप्पा सावंत हयांनी प्रतिपादन केले की, मागच्या वेळेपेक्षा सेवानिवासस्थान म्हणून वितरीत केलेल्या गाळयांची संख्या जास्त आहे. हयाचा अर्थ असा होतो की, उपकरप्राप्त पडलेल्या किंवा मोडकळीस आलेल्या इमारतीतील रहिवाशांना संक्रमण शिबीरातील गाळे वाटप प्राधान्याने वाटप न करता प्राधिकरणाच्या कर्मचा-याला मात्र त्याचे वाटप तात्काळ होते. प्राधिकरणातील कर्मचा-यांना सेवानिवासस्थान म्हणून दिल्या जाणा-या संक्रमण शिबीरातील गाळे वाटपास काहीच हरकत नाही. प्रस्तावात संक्रमण शिबीरातील गाळे वाटपाची जी आकडेवारी नमूद केली आहे ती पूर्णतः चुकीची आहे. घुसखोर गाळयांची संख्या खरोखरच जर ५७० असेल तर मात्र संक्रमण शिबीरातील अधिकारी/कर्मचारी यांचे अभिनंदन करावे लागेल.

मा. सदस्य श्री विश्वास मोकाशी हयांनी तदनंतर अशी विचारणा केली की, सद्यः संक्रमण शिबीरातील गाळे वाटपाबाबतचे किती प्रस्ताव प्रलंबित आहेत किंवा सद्यः गाळे वाटपाचा एकही प्रस्ताव प्रलंबित नाही? मा. सदस्य श्री रघुनाथ थवई हयांनीही अशी विचारणा केली की, आपात्कालिन परिस्थितीत संक्रमण शिबीरातील गाळे वाटप करण्यासाठी आपल्या संक्रमण शिबीरांमध्ये किती रिक्त गाळे उपलब्ध आहेत.

हयाबाबत उपमुख्य अधिकारी (सं.गा.) श्रीमती पूगांवकर यांनी असा खुलासा केला की, गाळे वाटपासाठी प्रलंबित असलेल्या प्रस्तावांची संख्या सद्यः उपलब्ध नाही. परंतु फक्त एकाच इमारतीतील रहिवाशांना संक्रमण शिबीरातील गाळे वितरीत करणे शिल्लक आहे. सद्यः मंडळाकडे संक्रमण शिबीरातील ३९५ गाळे वितरणासाठी उपलब्ध आहेत.

तद्नुषंगाने मा. सदस्य श्री विश्वास मोकाशी हयांनी अशी विचारणा केली की, सद्यः जर फक्त एकाच इमारतीतील रहिवाशांना संक्रमण शिबीरातील गाळे वाटप करण शिल्लक असेल तर मग गाळे वाटपासाठी विलंब का होतो? रहिवाशांना संक्रमण शिबीरातील गाळे वाटपासाठी वारंवार खेपा का घालाव्या लागतात?

हयाबाबत उपमुख्य अधिकारी (सं.गा.) श्रीमती पूगांवकर यांनी असा खुलासा केला की, संक्रमण शिबीरातील गाळे वाटपासाठी प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर आपण त्वरित वितरण आदेश काढतो. परंतु वितरीत केलेला संबंधित गाळा योग्य नसल्याचे सांगून रहिवाशी त्यांच्या आवडीच्या ठिकाणच्या गाळयाची मागणी करतात. आवडीच्या ठिकाणी गाळा प्रत्येक वेळेस उपलब्ध असतोच असे नाही. एखाद्या रहिवाशाला त्याला वाटप केलेल्या गाळयाऐवजी दुस-या गाळयाची मागणी करतात. त्यानुसार उपलब्धतेनुसार गाळा बदलूनही दिला जातो. परंतु आवडीच्या ठिकाणीच्याच गाळयांची मागणी अनेक रहिवाशी करीत असतात व प्रत्येक रहिवाशास त्याच्या आवडीनुसार गाळयाचे वाटप करणे अशक्य आहे. हया कारणांमुळेच प्रामुख्याने गाळे वाटपास विलंब होतो.

तदनंतर मा. सदस्य श्री विश्वास मोकाशी हयांनी अशी विचारणा केली की, आपली जी संक्रमण शिबीरातील गाळे वितरणाची जी पध्दती आहे त्यानुसार नेमकी पध्दती काय आहे? आपण प्रथम येणा-यास प्रथम गाळे वितरण अशी पध्दती अवलंबितो का? १०० प्रलंबित प्रस्तावांपैकी पहिला प्रस्ताव कोणत्या तारखेपासून प्रलंबित आहे? त्यांनी तदनंतर खेद व्यक्त करुन असे प्रतिपादन केले की, पुनर्विकासांतर्गत प्रस्तावांमध्ये आपण संक्रमण शिबीरातील गाळ्यांचे वाटप त्वरित करतो परंतु जून्या व मोडकळीस आलेल्या वा पडलेल्या/पाडलेल्या उपकरप्राप्त इमारतीतील रहिवाशांना अत्यंत आवश्यकता असतानासुध्दा संक्रमण शिबीरातील गाळ्यांच्या वाटपास वारंवार मागणी करुनही विलंब होतो. त्यामुळे सद्यः संक्रमण शिबीरातील गाळे वितरणाची जी पध्दती आहे ती पूर्णतः चुकीची आहे. त्यामुळे हया वितरण पध्दतीत सुधारणा करणे आवश्यक असून **प्रथम येणा-यास प्रथम गाळा** हया पध्दतीचा अवलंब करणे आवश्यक आहे. संक्रमण शिबीरातील गाळयांची गरज ही सर्वांनाच असते. पुनर्विकासांतर्गत इमारती असोत किंवा जुन्या उपकरप्राप्त इमारती असोत सर्वांनाच संक्रमण शिबीरातील गाळयांची आवश्यकता असते. बाब टिपणीत नमूद केल्यानुसार लोकप्रतिनिधींकडून गाळे वाटपासाठी दबाव येतो असे नमूद केले आहे. लोकप्रातिनिधी हे सर्वसामान्य जनतेने निवडून दिलेले असल्याने जनतेची कामे करणे त्यांचे कर्तव्यच आहे व त्यानुसार ते गाळे वाटपासाठी दबाव आणण्याचा प्रयत्न करणारच. मात्र . बाब टिपणीत असेही नमूद केले आहे की, संक्रमण शिबीरातील गाळे वाटपासाठी वरिष्ठांकडूनही दबाव येतो. हयाबाबत मा. सदस्य श्री विश्वास मोकाशी हयांनी अशी विचारणा केली की, वरिष्ठांकडूनही दबाव येतो म्हणजे नक्की काय ? नियमांचे उल्लंघन करण्यास वरिष्ठ सांगतात का?

तदनंतर मा. सदस्य श्री बाप्पा सावंत हयांनी असे निदर्शनास आणून दिले की, २१ धोकादायक इमारतींपैकी एका इमारतीच्या ३ रहिवाशांनी , संक्रमण शिबीरातील गाळा मिळण्यासाठी अर्ज केला असून त्यांना अद्याप संक्रमण शिबीरातील गाळयांचे वाटप केलेले नाही. हया राहिवाशांनी कुलाबा येथील संक्रमण शिबीरातील गाळयांची मागणी केली असता त्यांना असे सांगण्यात आले की, त्यांना सायन येथील संक्रमण शिबीरातील गाळयांचे सुध्दा वाटप करता येणार नाही व अद्यापपर्यंत हया रहिवाशांना संक्रमण शिबीरातील गाळयांचे वाटप केलेले नाही.

मा. सदस्य श्री सचिन सावंत हयांनी तदनंतर असे निदर्शनास आणून दिले की, संक्रमण शिबीरातील गाळयांची मागणी केलेले ५-६ रहिवाशी त्यांना भेटले होते तेव्हा हया रहिवाशांनी अशी भावना व्यक्त केली होती की, संक्रमण शिबीरातील गाळे न मिळण्याबाबत त्यांनी जर कोणाकडे दाद मागितली तर त्यांना संक्रमण शिबीरातील गाळे कधीच मिळू शकत नाहीत. अशाप्रकारे हया गाळे वितरण पध्दतीत दहशतीचे वातावरण आहे. सदर ५-६ रहिवाशी हयाबाबत तक्रारदेखील देणार होते. मात्र दहशतीमुळे ते आता तक्रारही देण्यास तयार नाहीत. ही अतिशय वाईट परिस्थिती आहे. एकूणच सर्वसामान्य जनतेमध्ये संक्रमण शिबीर कार्यालयाबाबत अतिशय नाराजीची भावना आहे. त्यामुळे आमच्यासारख्या सदस्यांना रहिवाशांना तोंड देणे अवघड होऊन बसले आहे.

मा. सदस्य श्री गजेंद्र लष्करी हयांनी तदनंतर असे प्रतिपादन केले की, संक्रमण शिबीर कार्यालयातील काही कर्मचारी रहिवाशांना असे सांगतात की, त्यांच्याकडे अतिरिक्त काम सोपविलेले

असल्यामुळे त्यांच्यावर कामाचा खूप ताण आहे व त्यामुळे गाळे वाटप त्वरित होऊ शकत नाही. वास्तविकतः ही गोष्ट रहिवाशांना सांगण्याचे काही कारण नाही. ते जर अतिरिक्त काम करु शकत नसतील तर संबंधित कर्मचारी/अधिका-याने तसे लिहून द्यावे. संक्रमण शिबीर कार्यालयामध्ये एका अशाप्रकारच्या अधिकारी/ कर्मचा-याची गरज आहे की, जो रहिवाशांना योग्यप्रकारे मार्गदर्शन करुन गाळे वाटपासाठी त्वरित मदत करु शकेल. त्यांनी पुढे असे निदर्शनास आणून दिले की, मुख्य अधिकारी/दुवपु मंडळ हे कुलाबा संक्रमण शिबीराबाबत जे कठोर परिश्रम घेत आहेत त्याबद्दल ते खरोखरच कौतुकास पात्र आहेत.

तदनंतर मा. सदस्य श्री. रघुनाथ थवई हयांनी अशी विचारणा केली की, आपण काही रहिवाशांना संक्रमण शिबीरातील गाळयांचे वाटप केले आहे परंतु वितरीत केलेला गाळा हा रिक्त नसून त्याठिकाणी अन्य व्यक्ती राहात असल्याचे निदर्शनास आले आहे अशी एकूण किती प्रकरणे आहेत?

उपमुख्य अधिकारी (सं.गा.) हयांनी हयाबाबत असा खुलासा केला की, एखाद्या रहिवाशास वितरीत केलेला गाळा हा रिक्त नसल्याचे आढळल्यास आपण अशा रहिवाशास त्वरित अन्य गाळयाचे वितरण करतो व सद्यः असे एकही प्रकरण प्रलंबित नाही.

मा. सदस्य श्री. गजेंद्र लष्करी हयांनी तदनंतर असे मत प्रदर्शित केले की, संक्रमण शिबीर कार्यालयामधील माहितीचे संपूर्णतः संगणकीरण करणे अत्यंत आवश्यक आहे. जेणेकरुन संगणकीकृत माहिती रहिवाशांना त्वरित उपलब्ध होऊन त्यांचे समाधान होईल.

मुख्य अधिकारी हयांनी हयाबाबत असे प्रतिपादन केले की, सन्मा. सदस्यांनी संक्रमण शिबीरातील गाळे वितरणाबाबत ज्या भावना केल्या त्यानुसार संक्रमण शिबीरातील गाळे वाटपासाठी रहिवाशांना योग्य ते मार्गदर्शन करुन गाळे वाटप त्वरित होण्याबाबत कार्यवाही करणे आवश्यक आहे. बहुतांशी रहिवाशी हे कुलाबा, माहिम, बांद्रा किंवा सायन येथील संक्रमण शिबीरातील गाळयांची मागणी करतात व सर्वसाधारणतः हया ठिकाणचे गाळे रिक्त नसतात. हयाबाबत पारदर्शकतेच्या दृष्टीने वितरण पध्दतीत सुधारणा करण्याबाबत ते प्रयत्न करतील.

मा. सदस्य श्री विश्वास मोकाशी हयांनी तदनंतर असे मत प्रदर्शित केले की, संक्रमण शिबीरातील गाळे वाटपासाठी मागणी केलेल्या रहिवाशांबरोबर कार्यालयीन कर्मचारीवर्गाने चांगली वर्तणूक केलेली नाही. त्यामुळे रहिवाशांना योग्य मार्गदर्शन करुन त्यांना गाळेवाटप लवकरात लवकर करण्याच्यादृष्टीने कार्यवाही व्हावी. तसेच प्रलंबित प्रस्तावांमध्ये जेष्ठतेनुसार गाळे वाटप करावे. उपमुख्य अधिकारी (पु.गा.) हयांनी बाब टिपणीत सुचविलेला उपाय क्र.४ हा रिक्त पदे भरण्याबाबतचा असून तो प्रशासकीय आहे तसेच मा. सदस्य श्री गजेंद्र लष्करी हयांनी उपस्थित केलेला अतिरिक्त कार्यभाराचा मुद्दा हा देखील प्रशासकीय आहे.

मा. सभापती हयांनी असे प्रतिपादन केले की, रहिवाशी जेव्हा संक्रमण शिबीरातील गाळे वाटपासाठी मागणी करतात तेव्हा त्यांना संक्रमण शिबीरातील गाळयांच्या उपलब्धतेबाबत योग्य ती माहिती देऊन त्याची मागणी मान्य करता येत आहे किंवा नाही हयाबाबत स्पष्ट उत्तर देण्यात यावे. ब-याचवेळा रहिवाशी अमुक एका ठिकाणच्या संक्रमण शिबीरातील गाळयांची मागणी करतात,

ज्याठिकाणी गाळे उपलब्ध नसतात. काही रहिवाशी तर आपणांसच सांगतात की, अमूक ठिकाणचा अमूक गाळा रिक्त असून त्याचे वाटप करावे. मात्र आपल्या कार्यालयातील दप्तरावर सदर गाळा रिक्त नसतो. अशाप्रकारे आपल्याच कार्यालयामध्ये चूकीची माहिती उपलब्ध असते. ब-याचवेळा कार्यालयीन नोंदीनुसार रिक्त असलेल्या गाळयांचे वाटप अगोदरच झालेले असते वा तेथे अनधिकृत घुसखोर व्यक्ती रहात असतात. घुसखोर व्यक्तींना काढून टाकण्याबाबत आपण वेळोवेळी प्रयत्न केलेले आहेतच परंतु एखाद्या दुस-या प्रकरणात मा. मंत्री महोदय वा अन्य मान्यवर व्यक्तींच्या आग्रहामुळे आपल्याला घुसखोर व्यक्तींना काढणे शक्य होत नाही. आर्थिक उत्पन्नाच्या दृष्टीने आपण संक्रमण शिबीरातील काही गाळे झोपडपट्टी पुनर्विकास योजनेंतर्गत बाधित रहिवाशंनाही देऊ केले आहेत. त्यामुळे एकूण उपलब्ध गाळयांमधील किती टक्के गाळे आपण अशाप्रकारे देऊ शकतो हयाबाबत विचार होणे आवश्यक आहे. संक्रमण शिबीरातील गाळयांची मागणी करणा-या रहिवाशांना वेगवेगळी माहिती व उत्तरे न देता अचूक माहिती देणे आवश्यक आहे. बाब टिपणीत नमूद केल्यानुसार वरिष्ठांकडून येणा-या दबावाबाबत मा. सभापती हयांनी असे प्रतिपादन केले की, त्यांच्याकडे जेव्हा एखादा रहिवाशी संक्रमण शिबीरातील गाळयांची मागणी करतो तेव्हा तो रहिवाशी त्यांच्या नात्यातील किंवा ओळखीचा नसतो. संबंधित रहिवाशाने मागणी केल्यानुसार त्याला संक्रमण शिबीरातील गाळयाचे वाटप करण्याची शिफारस केली जाते. परंतु हयाचा अर्थ असा नव्हे की, आपली वितरण पध्दती डावलून त्यांना त्वरित गाळयाचे वितरण करावे. ब-याचवेळा आम्हीही रहिवाशांना सांगतो की, त्यांना हव्या असलेल्या संक्रमण शिबीरात गाळे उपलब्ध नाहीत.

मा. सभापती हयांनी असेही प्रतिपादन केले की, पावसाळा जवळ आला असल्याने संक्रमण शिबीराच्या देखभालीकडेही लक्ष देण्याची आवश्यकता आहे. सन्मा. सदस्यांनी संक्रमण शिबीरांना भेटी देऊन त्यांच्या देखभालीबाबत संबंधित अधिका-यांना लक्ष देण्यास सांगावे व आवश्यक असणा-या दुरुस्त्या त्वरित संबंधित अधिका-यांनी कराव्यात जेणेकरुन संक्रमण शिबीरात राहणा-या रहिवाशांची पावसाळयात गैरसोय होणार नाही.

बाब क्रमांक :७८/४

विषय- १) इ.क्र.१६, कामाठीपूरा, १४वी गल्ली, मुंबई-८ येथील भूखंड त्यावरील इमारतीसह नियोजित ओम साई सहकारी सदन सहकारी गृहनिर्माण संस्थेकरता कलम १०३-ब अन्वये भूसंपादन करण्याचा प्रस्ताव शासनाकडे सादर करण्यासाठी मंडळाची मंजूरी मिळणेबाबत.

२) इ.क्र.६२-६६, जोशी बिल्डिंग, डॉ. सुंदरलाल बहेल पत्र (गोवा स्ट्रीट), फोर्ट, मुंबई-१ येथील भूखंड त्यावरील इमारतीसह नियोजित गृहनिर्माण संस्थेकरिता संपादन करण्यासंबंधीच्या प्रस्तावास मंडळाने दिलेली मान्यता रद्दबातल करणेबाबत.

अनु.क्र.१ वरील प्रस्ताव पृ.क्र.७३ ते ७७ वर सादर करण्यात आला आहे.

हयाबाबत कार्यकारी अभियंता (स.सं.कक्ष) हयांनी असे प्रतिपादन केले की, हया प्रस्तावात ७५ टक्के रहिवाशांनी संमती दिलेली असून सदर प्रस्ताव शासनाकडे भूसंपादन कार्यवाहीच्या मंजूरीसाठी सादर करावयाचा आहे.

हया प्रस्तावाबरोबरच आयत्यावेळच्या विषयामध्ये अनु.क्र.२ वर इ.क्र.६२-६६, जोशी बिल्डिंग, डॉ. सुंदरलाल बहेल पथ (गोवा स्ट्रीट), फोर्ट, मुंबई-१ येथील भूखंड त्यावरील इमारतीसह नियोजित सह.गृह.संस्थेकरीता भूसंपादन करण्याच्या प्रस्तावास मंडळाच्या दि. ३०.३.२००० रोजीच्या बैठकीत मंजूरी देण्यात आली होती. परंतु तदनंतर सह.गृह.संस्थेच्या मुख्य प्रवर्तकाने असे कळविले आहे की, इमारतीतील ५० टक्क्यापेक्षा अधिक गाळे अनिवासी वापराचे आहेत. प्राधिकरण अधिनियम १९७६ मधील कलम १०३-ब नुसार ५० टक्क्यापेक्षा अधिक गाळे अनिवासी वापराचे असल्यास अशा इमारती सदर कलमानुसार रहिवाशांच्या सह.गृ.नि.संस्थांना संपादीत करुन हस्तांतरित करण्यास पात्र होत नाहीत. त्यामुळे हया प्रस्तावात मंडळाने पूर्वी दिलेली मंजूरी रद्दबातल करणे आवश्यक आहे.

वरील सविस्तर चर्चेअंती दोन्ही प्रस्ताव मान्य करण्याचे सर्वानुमते ठरले.

ठराव क्रमांक : ७८/५९४

१) इ.क्र.१६, कामाठीपूरा, १४वी गल्ली, मुंबई-८ येथील भूखंड त्यावरील इमारतीसह नियोजित ओम साई सहकारी सदन सहकारी गृहनिर्माण संस्थेकरिता कलम १०३-ब अन्वये भूसंपादन करण्याचा प्रस्ताव शासनाकडे सादर करण्यासाठी सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

२) इ.क्र.६२-६६, जोशी बिल्डिंग, डॉ. सुंदरलाल बहेल पथ (गोवा स्ट्रीट), फोर्ट, मुंबई-१ येथील भूखंड त्यावरील इमारतीसह नियोजित सह.गृह.संस्थेकरीता भूसंपादन करण्याच्या प्रस्तावास मंडळाने दि. ३० मार्च २००० रोजीच्या बैठकीत दिलेली मान्यता हया इमारतीमध्ये ५० टक्क्यापेक्षा जास्त अनिवासी गाळे असल्याने रद्दबातल करण्याच्या प्रस्तावास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

....

बाब क्रमांक :७८.६

विषय- **दक्षिण परिमंडळातील उपकरप्राप्त इमारतींच्या दुरुस्ती कामांच्या मुळ व सुधारित नकाशे व अंदाजपत्रकांना प्रशाकीय मंजूरी प्रदान करण्याबाबत.**

सदर प्रस्ताव पृ.क्र. ७९ ते १५९ वर सादर करण्यात आले आहेत.

उपमुख्य अभियंता (द.) हयांनी असे प्रतिपादन केले की, दक्षिण परिमंडळातील ए विभागातील २, बी. विभागातील ६, सी१-२ विभागातील ५, सी३-४ विभागातील ६, डी-१ विभागातील ५ व डी-२ विभागातील ८ अशी एकूण ३२ उपकरप्राप्त इमारतींच्या दुरुस्ती कामाच्या मूळ व सुधारित नकाशे व अंदाजपत्रके प्रशासकीय मंजूरीसाठी सादर करण्यात आली आहेत. हयाशिवाय मा. अध्यक्षांच्या

परवानगीने आयत्यावेळच्या विषयामध्ये दक्षिण परिमंडळातील एकूण १२ इमारतींच्या दुरुस्तीची मूळ व सुधारित अंदाजपत्रके प्रशासकीय मान्यतेसाठी सादर करण्यात आली आहेत.

सविस्तर चर्चेअंती दक्षिण परिमंडळातील एकूण ४४ उपकरप्राप्त इमारतींच्या दुरुस्ती कामाच्या मुळ व सुधारित नकाशे व अंदाजपत्रकांना प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्याचे सर्वानुमते ठरले.

ठराव क्रमांक : ७८/५९५

दक्षिण परिमंडळातील एकूण ४४ उपकरप्राप्त इमारतींच्या दुरुस्ती कामांच्या मुळ व सुधारित नकाशे व अंदाजपत्रकांना सोबत जोडलेल्या "परिशिष्ट-अ" नुसार प्रशासकीय मंजूरी सर्वानुमते प्रदान करण्यात आली.

....

बाब क्रमांक : ७८/७

अ) विषय- **तेजुकाया चाळ क्र.१, डॉ.बी.ए.रोड हया इमारतीच्या दुरुस्तीसाठी सुधारित प्रशासकीय मंजूर रक्कमेपेक्षा वाढीव झालेल्या खर्चास मंजूरी मिळणेबाबत.**

सदर प्रस्ताव पृ.क्र.१५७ ते १५९ वर सादर करण्यात आला आहे.

उपमुख्य अभियंता (उत्तर) हयांनी असे प्रतिपादन केले की, हया इमारतीच्या दुरुस्तीच्या पाचव्या टप्प्याच्या सुधारित नकाशे व अंदाजपत्रकास रक्कम रु. २७८७३५३/- (रु. ९६१.६५ प्रति चौ.मी. दराने) प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्यात आली होती. परंतु सदर प्रत्यक्षात दुरुस्तीसासाठी झालेला खर्च हा रु. २९३३८६०/- (रु. १०१२.२० प्रति चौ.मी. दराने) आहे, जो सुधारित प्रशासकीय मंजूर रक्कमेपेक्षा रु. १४६५०७/- ने जास्त आहे. त्यामुळे प्रमाणित मर्यादा रु.१०००/- प्रतिं चौ.मी. दरापर्यंत झालेल्या अधिक खर्च रु.१११९४७/- हया रक्कमेस मंडळाची मंजूरी आवश्यक आहे.

हयाबाबत मा. सदस्य श्री रघुनाथ थवई हयांन असे प्रतिपादन केले की, वाढीव खर्च मंजूरीचे प्रस्ताव मंजूर करण्यापूर्वी संबंधित इमारती सन्मा. सदस्यांना दाखवाव्यात. त्याअनुषंगाने मा. सभापती यांनी सदर कामाची पाहणी सन्मा. सदस्य श्री रघुनाथ थवई हयांनी करावी असे सुचविले. त्यानुसार सदर काम मा. सदस्य श्री रघुनाथ थवई हयांना दाखविण्याच्या अटीवर रु. १०००/- प्रति चौ.मी. दरापर्यंत अधिक झालेल्या खर्चास मंजूरी देण्याचे सर्वानुमते ठरले.

ठराव क्रमांक : ७८/५९६

तेजुकाया चाळ क्र.१, डॉ.बी.ए.रोड हया इमारतीचे काम मा. सदस्य श्री रघुनाथ थवई हयांना दाखविण्याच्या अटीवर हया इमारतीच्या दुरुस्तीसाठी सुधारित प्रशासकीय मान्यतेपेक्षा रु. १०००/- प्रति चौ.मी. पर्यंतच्या अधिक झालेल्या खर्चास (रु.१११९४७/-) सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

....

बाब क्रमांक : ७८/७

ब) विषय- प्राधिकरण अधिनियम १९७६ च्या कलम ८८ (३) (अ) प्रमाणपत्र जारी करण्याचे प्रस्ताव.

१) इ.क्र.७१६-७४४, पंढारे दगडी चाळ, बापूराव जगताप मार्ग, ई.विभाग, सुधारित प्रस्ताव,

२) इ.क्र.३६६-३६६बी, बनातवाला चाळ क्र.१, गणपतराव कदम मार्ग, ग/दक्षिण विभाग

३) इ.क्र.१२, भक्ती बिल्डिंग, के.व्ही. चितळे पर्थ, दादर.

वरील तिन्ही प्रस्ताव पृ.क्र.१६२ ते १८५ वर सादर करण्यात आले आहेत.

मुख्य अधिकारी हयांनी असे प्रतिपादन केले की, परवा शासन स्तरावर झालेल्या बैठकीत असा मुद्दा उपस्थित करण्यात आला होता की, आपण जेव्हा इमारत कलम ८८ (३) (अ) प्रमाणपत्रान्वये घोषित करतो तेव्हा ती इमारत दुरुस्ती खर्चाच्या प्रमाणित मर्यादे पलिकडे आहे असे घोषित करतो. एखादी इमारत जेव्हा ८८ (३) (अ) कलमान्वये घोषित करावयाची असते तेव्हा दुरुस्ती विभागामार्फत वेगळा वास्तुशास्त्रज्ञ नेमला जातो व तदनंतर अशा ८८ (३) (अ) कलमान्वये घोषित केलेल्या इमारतीची पुनर्बांधणी योजना शक्य आहे किंवा नाही हयाची पडताळणी करण्यासाठी पुनर्रचना विभागातर्फे आणखी वेगळया वास्तुशास्त्रज्ञाची नेमणूक केली जाते. प्रत्येक वेळी वेगवेगळा वास्तुशास्त्रज्ञ नेमल्याने बराच कालापव्यय होऊन साधारणतः एक वर्षाचा कालावधी संपून जातो व तदनंतर आपण भूसंपादनाच्या कार्यवाहीस सुरवात करतो. हया संपूर्ण प्रक्रियेमध्ये सर्वसाधारणतः ३-४ वर्षांचा कालावधी जातो. हयाबाबत शासन स्तरावर एक प्रस्ताव मंजूरीसाठी विचाराधीन असून त्यानुसार ८८ (३) (अ) कलमान्वये घोषित करण्याच्या प्रस्तावामध्ये नेमलेल्या वास्तुशास्त्रज्ञाचीच नेमणूक संबंधित इमारतीची पुनर्बांधणी योजना शक्य आहे किंवा नाही हयाची पडताळणी करण्यासाठी करावी व त्याबाबतचा अहवाल संबंधित वास्तुशास्त्रज्ञाने २-३ महिन्यात सादर करावा. शासनाकडून मंजूरी आल्यानंतर त्याबाबतचा विषय मंडळाच्या पुढील बैठकीत माहितीसाठी सादर केला जाईल. परंतु येथून पुढे ८८ (३) (अ) प्रस्तावासाठी व इमारतीची पुनर्बांधणी योजना शक्य आहे किंवा नाही हयाची पडताळणी करण्यासाठी वेगवेगळया वास्तुशास्त्रज्ञांची नेमणूक न करता एकाच वास्तुशास्त्रज्ञाची नेमणूक करावी.

मुख्य अधिकारी हयांनी पुढे असेही प्रतिपादन केले की, शासन स्तरावरील बैठकीत उपस्थित करण्यात आलेल्या मुद्दयांनुसार मंडळाकडे कलम ८८ (३) (अ) प्रमाणपत्रान्वये घोषित करावयाचे प्रस्ताव खूपच कमी असल्याने मंडळाकडे पुनर्बांधणीची कार्यवाही सुरु असलेले प्रस्तावही खूपच अत्यल्प आहेत. शासनाचे असे म्हणणे आहे की,दुरुस्तीसाठी अधिक प्राधान्य न देता जास्तीतजास्त पुनर्बांधणी कामांकडे भर देणे आवश्यक आहे. त्यामुळे मंडळाच्या प्रत्येक बैठकीमध्ये किमान २-३ प्रस्ताव इमारती ८८ (३) (अ) कलमाखाली घोषित करण्याचे असावेत. कारण इमारत कलम ८८ (३) (अ) प्रमाणपत्रान्वये घोषित केल्यानंतर तिच्या पुनर्बांधणीच्या प्रत्यक्ष कामास सुरुवात होईपर्यंत ३-४

वर्षांचा कालावधी लागतो. त्यामुळे मुख्य अधिकारी हयांनी सर्व संबंधित अधिका-यांस असे आदेश दिले की, येथून पुढे जास्तीतजास्त इमारती ८८ (३) (अ) कलमान्वये घोषित करण्यावर भर देऊन त्यानुसार प्रस्ताव सादर करावेत.

मा. सभापती यांनी हयाबाबत असे प्रतिपादन केले की, आपण इमारत ८८ (३) (अ) कलमान्वये घोषित केल्यावर तिची भूसंपादनाची कार्यवाही सुरु करतो. दरम्यानच्या कालावधीत मालमत्ताधारक व रहिवाशी एकत्र येऊन स्वतः पुनर्विकास करण्याची इच्छा व्यक्त करतात. ब-याचवेळा काही प्रकरणात तर आपण पुनर्बांधणीचे कामही करु शकत नाही. त्यामुळे इमारत ८८ (३) (अ) कलमान्वये घोषित करुन भूसंपादन कार्यवाही सुरु केल्यानंतर मंडळाने घेतलेल्या पुनर्बांधणी योजनेस बाधा येणार नाही याची काळजी घ्यावी लागेल.

मुख्य अधिकारी हयांनी तदानुषंगाने असे प्रतिपादन केले की, हया विषयावर सखोल अभ्यास करण्यासाठी शासनाने एक समिती नेमली असून ते या समितीतील एक सदस्य सचिव आहेत. हा मुद्दा जेव्हा हया बैठकीत उपस्थित केला होता तेव्हा शासनाने असे मत प्रदर्शित केल होते की,मंडळाकडे सद्यः फक्त रु.४२ कोटीचाच कार्यक्रम आहे व मंडळाकडे पुनर्बांधणीचे खूपच कमी प्रस्ताव असल्याने मंडळाला अतिरिक्त निधीची आवश्यकता कशासाठी भासत आहे. त्यामुळे आपणांस शासनास येथून पुढे असे दाखवावे लागणार आहे की, मंडळाकडे सद्यः एवढया रक्कमेचे दुरुस्तीचे व पुनर्बांधणीचे प्रस्ताव हातात असून त्यासाठी एवढा निधी लागणार आहे. त्यामुळे कागदोपत्री आपणांस जास्तीतजास्त पुनर्बांधणी योजना हातात दाखविणे नितांत आवश्यक आहे व त्यासाठी जास्तीतजास्त इमारती ८८ (३) (अ) प्रमाणपत्रान्वये घोषित करुन त्यांची पुनर्बांधणी योजना राबविणे आवश्यक आहे. भूसंपादन प्रक्रिया पूर्ण होईपर्यंतच्या कालावधीमध्ये जर मालमत्ताधारक व रहिवाशांनी पुनर्विकासाचा प्रस्ताव सादर केलाच तर आपण त्यात पुनर्विकासासाठी ना.ह.प्र. देऊ शकतो.

मा. सभापती यांनी तदनंतर असे प्रतिपादन केले की,ज्या इमारतींच्या बाबतीत मालमत्ताधारक व रहिवाशी त्यांच्या इमारती पुनर्रचित करु इच्छित नाहीत अशा इमरती प्राधिकरण अधिनियम १९७६ च्या कलम ८८ (३) (अ) प्रमाणपत्रान्वये घोषित करण्यास प्राधान्य देण्यात यावे. एखादी इमारत दुरुस्ती खर्चाच्या प्रमाणित मर्यादेपलिकडे जात असली तरी अशा इमारती ८८ (३) (अ) प्रमाणपत्रान्वये घोषित करण्यापूर्वी साधारणतः १ ते २ वर्षांची मुदत मालमत्ताधारक व रहिवाशांना देणे आवश्यक आहे. ब-याचवेळा रहिवाशी त्यांच्या इमारतीची पुनर्रचना योजना केव्हा होईल हयाबाबत साशंक असतात. त्यामुळे ते इमारत पाडण्यास व पुनर्बांधणीच्या कार्यवाहीस विरोध करुन त्यांच्या इमारतीची दुरुस्ती आमदार निधी अंतर्गत वा इतर मार्गाने करावयाचा प्रयत्न करीत असतात. हया सर्व बाबींचा विचार करुनच इमारती ८८ (३) (अ) कलमाखाली घोषित करण्याची कार्यवाही करणे आवश्यक आहे.

मा. सदस्य श्री बाप्पा सावंत हयांनी तदनंतर असे प्रतिपादन केले की, आपण काल जेव्हा जुन्या धोकादायक इमारतींची पाहणी करण्यास गेलो होतो त्यावेळी आपण कामाठीपूरा व कुंभारवाडा येथील इमारतींचीही पाहणी केली. येथील इमारतींची अवस्था व परिस्थिती पाहता एका ठिकाणची एकच इमारत ८८ (३) कलमान्वये घोषित करण्याऐवजी अशा इमारती सभोवतालच्या इतरही इमारती

जर त्याचवेळी ८८ (३) (अ) कलमान्वये घोषित केल्यास आपण अशा ठिकाणी एक मोठी पुनर्बांधणी योजना किंवा संकुल उभारु शकू.

मुख्य अधिकारी हयांनी हयाबाबत असे निदर्शनास आणून दिले की, मा. सदस्य श्री बाप्पा सावंत हयांनी सुचविल्यानुसार माझगांव येथील नारियलवाडी येथे आपण अशाचप्रकारे ४-५ इमारती एकत्र करुन संयुक्त पुनर्बांधणी योजना राबवित आहोत. तदनुषंगाने मा. सभापती महोदयांनी असे निदर्शनास आणून दिले की, मोदी स्ट्रीटवर एक धोकादायक इमारत आहे. हया इमारतीसमोरच एक अरुंद भूखंड आहे. हया अरुंद भूखंडावर मंडळाने इमारत पुनर्रचित केली असून त्याबद्दल मंडळाचे अधिकारी अभिनंदनास पात्र आहेत. हयाच पुनर्रचित इमारतीच्या बाजूला एक तळ अधिक एक मजला स्वरुपाची इमारत आहे ही इमारत जर हया पुनर्रचित इमारतीच्या योजनेमध्ये समाविष्ट केली असती तर आपण आणखीनच चांगली पुनर्रचना योजना करु शकलो असतो. त्यामुळे भविष्यात पुनर्रचना योजना राबविताना सभोवतालच्याही इमारती संयुक्तरित्या पुनर्रचित करण्याबाबत विचार होणे आवश्यक आहे. हया पुनर्रचित इमारतीसमोरच एक इमारत पडलेली आहे.सद्यः फक्त तेथे तळ मजला अस्तित्वात आहे. ही इमारत २०-२५ वर्षांपूर्वी पडलेली आहे. मागील १-२ वर्षांपासून एका दुकानदाराने तेथे मोठे गॅरेज बांधले असून त्याठिकाणी तो त्याचा व्यवसाय करीत आहे. त्यामुळे हया समोरील जेव्हा पुनर्रचित करण्यात आली तेव्हा हया भूखंडाचा चटईक्षेत्र निर्देशांक त्याठिकाणी वापरण्याचा प्रयत्न करावयास हवा होता. येथून पुढे पुनर्रचना योजना राबविताना त्यादृष्टीनेंही विचार करणे आवश्यक आहे.

तदनंतर मा. सदस्य श्री बाप्पा सावंत हयांनी असे प्रतिपादन केले की, मुख्य अधिकारी हयांनी सुचविल्यानुसार आपण जास्तीतजास्त इमारती कलम ८८ (३) (अ) प्रमाणपत्रान्वये घोषित करणे आवश्यक आहे. जेणेकरुन जास्तीतजास्त पुनर्बांधणी प्रस्ताव कार्यान्वित करु शकू. थोडाफार त्यामध्ये विलंबही होईल परंतु शासनास आपण आपल्याकडे जास्तीत जास्त पुनर्बांधणी प्रस्ताव असल्याचे सांगू शकू.

मा. सदस्य श्री विश्वास मोकाशी हयांनी तदनंतर असा मुद्दा उपस्थित केला की, मा. सभापती महोदयांनी सांगितल्यानुसार इमारत एकदा ८८ (३) (अ) कलमान्वये घोषित केल्यानंतर अशा इमारतीच्या पुनर्विकासाचा प्रस्ताव प्राप्त झाला तर त्यामध्ये काही अडचणी निर्माण होण्याची शक्यता नाकारता येणार नाही.

तद्नुषंगाने मुख्य अधिकारी हयांनी असे प्रतिपादन केले की, इमारत ८८ (३) (अ) कलमान्वये घोषित करणे ही भूसंपादनाची प्राथमिक पायरी आहे. तदनंतर भूसंादन प्रक्रिया चालू करण्यासाठी कलम ९३ (१) नुसार आपणांस शासनाची परवानगी घ्यावी लागते व हया प्रक्रियेला साधारणतः एक वर्षाचा कालावधी लागतो. तदनंतर कलम ९३ (२), (३), (४) व (५) नुसार कार्यवाही पूर्ण होऊन जोपर्यंत कलम ९३ (६) नुसार जमिन मंडळाच्या ताब्यात येत नाही तोपर्यंत भूसंपादनाची प्रक्रिया पूर्ण होत नाही. प्रक्रिया पूर्ण होण्यास साधारणतः ४-५ वर्षांचा कालावधी लागतो. आजच्या बैठकीमध्ये पुनर्विकासाचा एक प्रस्ताव असून त्यामध्ये कलम ९३ (३) व (४) नुसार भूसंपादनाची कार्यवाही चालू आहे. परंतु जमिन मंडळाच्या ताब्यात नाही. भूसंपादनाची संपूर्ण प्रक्रिया पूर्ण होण्यास सर्वसाधारणतः

४-५ वर्षांचा कालावधी लागतो. त्यामुळे दरम्यानच्या कालावधीत जर पुनर्विकासाचा प्रस्ताव प्राप्त झालाच तर त्यास मंजूरी देण्यास काहीच अडचण नाही.

उपमुख्य अभियंता (पुनर्रचना) हयांनी इ.क्र.७१६-७४४ पंढारे दगडी चाळीच्या ८८ (३) (अ) प्रस्तावाबाबत असे निदर्शनास आणून दिले की, हया इमारतीच्या बाजूस असलेल्या व उपकरप्राप्त नसलेल्या दोन स्टॉलधारकांची नांवे त्यांच्या क्षेत्रफळासह रहिवाशांच्या यादीत दिलेली नाहीत. त्याबाबतची महिती देणे आवश्यक आहे.

उपमुख्य अभियंता (उत्तर) हयांनी तद्नुषंगाने असे प्रतिपादन केले की,उपकरप्राप्त नसलेल्या इमारतीतील रहिवाशांची/स्टॉल्सची माहिती रहिवाशांच्या यादीत देण्याची प्रथा नाही. ८८ (३) (अ) प्रस्तावांतर्गत फक्त उपकरप्राप्त इमारतीतील रहिवाशांचीच माहिती दिली जाते.

मुख्य अधिकारी हयांनी याबाबत असे प्रतिपादन केले की, एका छोटयाशा टपरीवजा स्टॉलमुळे पुनर्रचना योजना रखडण्याची अनेक उदाहरणे आहेत. त्यामुळे आज जर जागेवर स्टॉल्स अस्तित्वात आहेत तर अशा स्टॉलधारकांची नांवे त्यांच्या स्टॉल्सच्या क्षेत्रफळासह रहिवाशांच्या यादीमध्ये समाविष्ट करण्याचे आदेश मुख्य अधिकारी यांनी उपमुख्य अभियंता (उत्तर) हयांना दिले. व रहिवाशांच्या यादीमध्ये नोंद करताना त्याठिकाणी बिगर उपकरप्राप्त स्टॉल्सचे रहिवाशी असा उल्लेख करावा. तदनंतर हया प्रकरणाची सुनावणी भूसंपादन अधिका-यांबरोबर होणारच असून त्यावेळीही हयाबाबत विचारविनिमय होईलच.

मा. सभापती हयांनी तदनंतर असे प्रतिपादन केले की, बनातवाला हया इमारतीची पुनर्रचना संपूर्ण इमारत रस्ता रुंदीकरणात जात असल्याने शक्य नसल्याचे का.अ. (फग/द) विभाग हयांनी सांगितले आहे. त्यामुळे ही इमारत सद्यः ८८ (३) (अ) कलमान्वये घोषित करण्यास काहीच अर्थ नाही. त्यामुळे हा प्रस्ताव पुढे ढकलण्यात यावा.

वरील सविस्तर चर्चेअंती खालील इमारत प्राधिकरण अधिनियम १९७६ च्या कलम ८८ (३) (अ) प्रमाणपत्रान्वये घोषित करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्याचे ठरले.

ठराव क्रमांक : ७८/५९७

१) इ.क्र.७१६-७४४, पंढारे दगडी चाळ, बापूराव जगताप मार्ग,ई.विभाग, ही इमारत प्राधिकरण अधिनियम १९७६ च्या कलम ८८ (३) (अ) प्रमाणपत्रान्वये रहिवाशांच्या सुधारित यादी व क्षेत्रफळानुसार घोषित करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

२) इ.क्र.१२, भक्ती बिल्डिंग, के.व्ही. चितळे पथ, दादर. ही इमारत प्राधिकरण अधिनियम १९७६ च्या कलम ८८ (३) (अ) प्रमाणपत्रान्वये घोषित करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

....

३७

बाब क्रमांक : ७८/७

क) विषय- उत्तर परिमंडळातील उपकरप्राप्त इमारतींच्या दुरुस्ती कामांच्या मुळ व सुधारित नकाशे व अंदाजपत्रकांना प्रशाकीय मंजूरी प्रदान करण्याबाबत.

सदर प्रस्ताव पृ.क्र.१८७ ते २५३ वर सादर करण्यात आले आहेत.

हयाबाबत उपमुख्य अभियंता (उत्तर) यांनी असे प्रतिपादन केले की, उत्तर परिमंडळातील ई. विभागातील ११, फग/द विभागातील ८, व फग/ऊ विभागातील १० अशा एकूण २९ इमारतींच्या दुरुस्ती कामांची मूळ/सुधारित नकाशे व अंदाजपत्रके प्रशासकीय मंजूरीसाठी सादर करण्यात आली आहेत. हयाशिवाय मा. अध्यक्षांच्या परवानगीने आयत्यावेळच्या विषयामध्ये उत्तर परिमंडळातील एकूण ६ इमारतींच्या दुरुस्ती कामांची मूळ/सुधारित नकाशे व अंदाजपत्रके प्रशासकीय मंजूरीसाठी सादर करण्यात आली आहेत. सविस्तर चर्चेअंती उत्तर परिमंडळातील एकूण ३५ इमारतींच्या दुरुस्ती कामांच्या मुळ व सुधारित नकाशे व अंदाजपत्रकांना प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्याचे सर्वानुमते ठरले.

ठराव क्रमांक : ७८/५९८

उत्तर परिमंडळातील जुन्या व मोडकळीस आलेल्या एकूण ३५ उपकरप्राप्त इमारतींच्या दुरुस्ती कामांच्या मुळ व सुधारित नकाशे व अंदाजपत्रकांना सोबत जोडलेल्या " परिशिष्ट-ब " नुसार प्रशासकीय मंजूरी सर्वानुमते प्रदान करण्यात आली.

....

बाब क्रमांक :७८/८

मा.अध्यक्षांच्या परवानगीने आयत्यावेळच्या विषयात सादर करण्यात आलेले प्रस्ताव.

अ) पुनर्रचना विभाग

१) विषय- **पुनर्रचना योजनांसाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत.**

उपमुख्य अभियंता (पुनर्र.) हयांनी असे प्रतिपादन केले की, पुनर्रचना विभागातर्फे काही इमारतींच्या पुनर्बांधणीची कामे प्रगतीपथावर असून त्यापैकी काही इमारतींची कामे अंतिम टप्प्यात आहेत. परंतु हया इमारतींची कामे करणा-या ठेकेदारांना गेले ५ महिन्यांपासून निधी अभावी देयकांची अदायगी केली नसल्यामुळे त्यांना पुढील कामे करणे अशक्य झालेले आहे. पूर्णत्वास आलेल्या व प्रगतीपथावर असलेल्या पुनर्रचनेच्या कामांपोटी रु. २९४.३० लक्ष रक्कमेची देयके अदायगीसाठी प्रलंबित आहेत. त्यामुळे किमान पूर्णत्वास आलेल्या कामांच्या प्रलंबित देयकांची रक्कम १५१.२२ लक्ष अदा केल्यास अशा इमारतींबाबत पुढील कार्यवाही करणे शक्य होईल.

उपमुख्य अभियंता (पुनर्र.) हयांनी असेही निदर्शनास आणून दिले की, मुंबई भाडेकरु संघाने मा. न्यायालयात दाखल केलेला दावा क्र.१३५०/९८ च्या अनुषंगाने मंडळाने १११ इमारतींच्या पुनर्बांधणीचा कालबध्द कार्यक्रम मा. न्यायालयात सादर केलेला आहे. त्यामुळे पुनर्बांधणी विभागास तात्काळ निधी उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे.

मा. सदस्य श्री रमेश परब हयांनी हयाबाबत असे प्रतिपादन केले की, उपमुख्य अभियंता (पुनर्र.) हयांनी जो निधीबाबतचा प्रश्न उपस्थित केला आहे त्यावर गांभीर्याने विचार करण्याची आवश्यकता आहे. आपण हयाबाबत प्राधिकरणाला असा ठराव द्यायला हवा आहे की, पुनर्रचना विभागासाठी जास्तीतजास्त निधी उपलब्ध करुन द्यावा.

मुख्य अधिकारी हयांनी असे प्रतिपादन केले की, निधीच्या उपलब्धतेबाबत आपण शासन स्तरावर प्रयत्न करीतच आहोत. कालच शासनाकडे मा. मुख्यमंत्री हयांच्याकडे एक बैठक झाली. हया बैठकीस उपमुख्य अभियंता (पुनर्र.) हेही उपस्थित होते. हया बैठकीमध्ये असा मुद्दा उपस्थित करण्यात आला होता की, दुरुस्ती उपकरापोटी म.न.पा. ने रु. २३० कोटी मंडळाला देणे बाकी आहे. हा दुरुस्ती उपकरापोटीचा पैसा हा शासनाचा, म.न.पा.चा किंवा मंडळाच्या मालकीचा नसून तो उपकरप्राप्त इमारतीमध्ये रहाणा-या रहिवाशांचा आहे. त्यामुळे हा पैसा म.न.पा. ने त्वरित मंडळास उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य हयांनाही ही बाब पटली असून त्यांनी दुरुस्ती उपकरापोटीचा पैसा मंडळास त्वरित उपलब्ध करुन देण्याबाबतच्या सूचना दिल्या आहेत. ज्यावेळी आपणांस शासनाकडून निधी उपलब्ध करुन दिला जात नव्हता तेव्हा प्राधिकरणाने आपल्याला काही अटी व शर्तींवर निधी उपलब्ध करुन दिला होता. प्राधिकरणाकडून प्राप्त झालेल्या निधीतून आपण रु. १.८० कोटी देखमालीसाठी उपलब्ध करुन दिलेले आहेत. परंतु पुनर्बांधणी योजनेसाठी मात्र निधी उपलब्ध करुन दिलेला नव्हता. आता जो निधी उपलब्ध होईल त्यातून आपण पुनर्रचना विभागासाठी निधी उपलब्ध करुन देऊ. मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य हयांच्याकडे झालेल्या बैठकीच्या वेळेस मा. म.न.पा.आयुक्त हेही उपस्थित होते. मा. मुख्यमंत्र्यांनी त्याना आदेश दिलेले आहेतच की, दुरुस्ती उपकरापोटी म.न.पा. कडे जमा असलेली रक्कम त्वरित मंडळाकडे सूपूर्द करण्याची कार्यवाही करावी.

हयाबाबत मा. सभापती हयांनी असे प्रतिपादन केले की, मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य हयांच्याकडे झालेल्या बैठकीत मंडळाला निधी उपलब्ध करुन देण्यबाबतच्या प्रश्नावर प्रदीर्घ चर्चा झाली आहे. हया चर्चेमध्ये त्यांना असे सांगण्यात आले होते की, शासनाकडून म.न.पा. ला रक्कम येणे बाकी असल्याने दुरुस्ती उपकराची रक्कम मंडळाला देता येत नाही तेव्हा आपण मा. मुख्यमंत्री यांना सांगितले होते की, दुरुस्ती उपकरापोटीचा पैसा हा शासनाचा, म.न.पा.चा किंवा मंडळाच्या मालकीचा नसून तो उपकरप्राप्त इमारतीमध्ये राहणा-या गोरगरीब जनतेचा पैसा आहे. हा पैसा जर म.न.पा. ने वा शासनाने अडकवून ठेवण्याचा प्रयत्न केला व जर त्याविरुध्द मा. न्यायलयात जनहित याचिका दाखल केली गेली तर तो पैसा त्वरित मंडळाला द्यावा लागेल. हे मुद्दे मा. मुख्यमंत्री हयांना पटल्यानंतर त्यांनी दुरुस्ती उपकरापोटीची रक्कम त्वरित मंडळाला सुपूर्द करण्याचे आदेश म.न.पा.आयुक्ताना दिलेले आहेत व त्याची नोंद सदर बैठकीच्या कार्यवृत्तांतामध्येही होणार आहे.

त्यामुळे हा पैसा त्वरित मिळण्यासाठी आपण पाठपुरावा करणे आवश्यक आहे. मा. सभापती महोदयांनी म.न.पा. सदस्य श्री गजेंद्र लष्करी हयांनाही हयाबाबत पाठपुरावा करण्याबाबत विनंती केली.

....

२) विषय- **इ.क्र.१४-१६, बांका मोहल्ला, भूखंड क्र. ६७२-६७३, भुलेश्वर विभाग, सी.विभाग हया इमारतीच्या पुनर्रचना योजनेस प्रशासकीय मान्यता मिळण्याबाबत.**

उपमुख्य अभियंता (पुनर्र.) हयांनी हयाबाबत असे प्रतिपादन केले की, हया जून्या इमारतींत एकूण ३४ रहिवाशी असून नवीन प्रस्तावित इमारतीमध्ये एकूण २३ गाळे बांधले जाणार आहेत. त्यामुळे एकूण ११ गाळे कमी उपलब्ध होणार आहेत. हया योजनेचा अंदाजे खर्च रु. ६०३२८७५/- असून त्यास प्रशासकीय मंजूरीची आवश्यकता आहे.

सविस्तर चर्चेअंती हया पुनर्बांधणी योजनेस प्रशासकीय मंजूरी देण्याचे सर्वानुमते ठरले.

....

३) विषय- **इ.क्र.२२०सी, २२०ई, तारामहल, बी.जे.मार्ग डी.विभाग हया इमारतीच्या पुनर्रचना योजनेस प्रशासकीय मान्यता मिळण्याबाबत.**

उपमुख्य अभियंता (पुनर्र.) हयांनी हयाबाबत असे प्रतिपादन केले की, जून्या इमारतींत एकूण ३३ गाळे असून प्रस्तावित नवीन इमारतीमध्ये एकूण ४७ गाळे बांधले जाणार आहेत. त्यामुळे हया योजनेत मंडळास १४ गाळे अतिरिक्त उपलब्ध होणार आहेत. हया पुनर्बांधणी योजनेस रु.१२७.७३ लक्ष खर्च अपेक्षित असून त्यास प्रशासकीय मंजूरीची आवश्यकता आहे.

सविस्तर चर्चेअंती सदर पुनर्बांधणी योजनेस प्रशासकीय मंजूरी देण्याचे सर्वानुमते ठरले.

....

४) विषय- **इ.क्र.१५-२१,खाखा गल्ली,६वी फॉकलंड रोड, डी.विभाग हया इमारतीच्या पुनर्बांधणी योजनेस सुधारित प्रशासकीय मान्यता मिळण्याबाबत.**

उपमुख्य अभियंता (पुनर्र.) हयांनी हयाबाबत असे प्रतिपादन केले की, हया योजनेस दि. २३.३.९३ रोजी रु. २८/- लक्ष रक्कमेस प्रशासकीय मंजूरी देण्यात आली आहे. परंतु जुन्या इमारतीतील तळ मजल्यावरील दुकानदारांनी न्यायालयात दावा दाखल केल्याने त्याचा निकाल सन १९९५ मध्ये लागला. तसेच तदनंतर किमान २२५.०० चौ.फू. क्षेत्रफळाप्रमाणे नकाशे सुधारित करुन त्यास म.न.पा. ची मंजूरी मिळण्यास बराच कालावधी लागला. हयामुळे पूर्वीची प्रशासकीय मान्यता

३०

सुधारित करावी लागली असून त्यानुसार हया योजनेवर रु. ११२.९४ लक्ष खर्च अपेक्षित आहे. त्यामुळे सदर खर्चास सुधारित प्रशासकीय मंजूरी देण्यासाठी सदर प्रस्ताव सादर केला आहे.

सविस्तर चर्चेअंती सदर पुनर्बांधणी योजनेस प्रशासकीय मंजूरी देण्याचे सर्वानुमते ठरले.

....

५) विषय- **इ.क्र.१६जी ते के नौशिर भरुचा मार्ग, नवी चिखलवाडी येथे वेलफेअर सेंटर बांधण्याकरिता ना हरकत प्रमाणपत्र मिळणेबाबत.**

उपमुख्य अभियंता (पुनर्र.) हयांनी हयाबाबत असे प्रतिपादन केले की, विषयांकित जागेवर आपण ८ इमारती पुंनर्रचित केल्या असून इ.क्र.९ च्या पुनर्बांधणीचे काम सुरु आहे. हया भूखंडावरील इमारतींच्या भाडेकरु संघाने विविध सांस्कृतिक कार्यक्रम राबविण्याकरिता वेलफेअर सेंटर बांधण्याची मागणी केली आहे. परंतु सदर मागणी म.न.पा. तर्फे मान्य केली जाणार नाही. मात्र त्याठिकाणी बँड स्टँडची परवानगी मिळणे शक्य आहे व त्यानुसार बँड स्टँडची तरतुद करुन नकाशे म.न.पा. कडे मंजूरीसाठी पाठविण्यात आले आहेत. म.न.पा. ची नकाशांना मंजूरी घेऊन सदर बँड स्टँड रहिवाशी संघाने स्वखर्चाने व त्याच्या देखभालीची संपूर्ण जबाबदारी रहिवाशी संघाने घेण्याच्या अटीवर बँड स्टँड बांधण्यास परवानगी देण्यास हरकत नाही. त्यासाठी मंजूरीस्तव हा प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.

मा. सदस्य, श्री बाप्पा सावंत हयांनी हयाबाबत असे प्रतिपादन केले की, येथील रहिवाशी ब-याच कालावधीपासून त्याबाबत मागणी करीत आहेत. मा. आदार श्री लोढा यांनीही हयाबाबत पूर्वी मागणी केलेली आहे. रहिवाशांनी मंडळामार्फत हा प्रस्ताव म.न.पा. कडे पाठविल्यास त्यास म.न.पा. मंजूरी देण्यास तयार आहे. त्यामुळे हा प्रस्ताव मंजूर करण्यास हरकत नाही.

सविस्तर चर्चेअंती सदर प्रस्ताव सर्वानुमते मंजूर करण्याचे ठरले.

....

६) विषय- **इ.क्र. ४३-५१, कामाठीपूरा, १०वी गल्ली, भूकर पाहणी क्र. ५१७, भायखळा, ई.विभाग हया इमारतींच्या संयुक्त पुनर्बांधणी योजनेस प्रशासकीय मंजूरी देणेबाबत.**

उपमुख्य अभियंता (पुनर्र.) हयांनी हयाबाबत असे प्रतिपादन केले की, हया योजनेनुसार जुन्या १९ गाळयांच्या ठिकाणी नवीन इमारतीत आपण एकूण ४० गाळे प्रस्तावित केलेले अहेत. ज्यामुळे मंडळास एकूण २१ अतिरिक्त गाळे उपलब्ध होणार आहेत. हया योजनेसाठी रु. ९६,९०,७६५/- इतका खर्च अपेक्षित असून त्यासाठी प्रशासकीय मंजूरीची आवश्यकता आहे.

सविस्तर चर्चेअंती सदर पुनर्बांधणी योजनेस प्रशासकीय मंजूरी देण्याचे सर्वानुमते ठरले.

७) विषय- **इ.क्र. १८, त्रिभूवन रोड, डी. विभाग, मुंबई हया पुनर्रचित इमारतीच्या नामांकरन प्रस्तावास मंजूरी मिळण्याबाबत.**

उपमुख्य अभियंता (पुनर्र.) हयांनी हयाबाबत असे प्रतिपादन केले की, हया इमारतीतील रहिवाशांनी हया इमारतीस "त्रिमूर्ती" हे नाव सुचविले असून त्यानुसार हा प्रस्ताव मंजूरीसाठी सादर करण्यात आला आहे.

सविस्तर चर्चेअंती सदर प्रस्ताव मंजूर करण्याचे सर्वानुमते ठरले.

ठराव क्रमांक : ७८/५९९

१) इ.क्र.१४-१६, बांका मोहल्ला, भूखंड क्र. ६७२-६७३, भुलेश्वर विभाग, सी.विभाग हया इमारतीच्या पुनर्रचना योजनेस रक्कम रु. ६०३२८७५/- इतक्या रक्कमेस प्रशासकीय मंजूरी सर्वानुमते प्रदान करण्यात आली.

२) इ.क्र.२२०सी, २२०ई, तारामहल, बी.जे.मार्ग, डी.विभाग हया इमारतीच्या पुनर्बांधणी योजनेस रक्कम रु. १२७.७३/- लक्ष इतक्या रक्कमेस प्रशासकीय मंजूरी सर्वानुमते प्रदान करण्यात आली.

३) इ.क्र.१५-२१,खाखा गल्ली,६वी फॉकलंड रोड डी.विभाग, मुंबई हया इमारतीच्या पुनर्बांधणी योजनेस रक्कम रु. ११२.९४/- लक्ष इतक्या रक्कमेस सुधारित प्रशासकीय मंजूरी सर्वानुमते प्रदान करण्यात आली.

४) इ.क्र.१६जी ते के नौशिर भरुचा मार्ग, नवी चिखलवाडी हया पुनर्बांधणी योजनेतील एस.आर. पी. बिल्डिंग क्र.३ च्या समोरील आरक्षणाच्या जागेवर बँड स्टँड बांधण्यासाठी खालील अटींची पूर्तता करण्याच्या अटीवर सर्वानुमते मंजूरी देण्यात अली.

अ) प्रस्तावित बँड स्टँड च्या नकाशास म.न.पा.ची परवानगी घ्यावी,

ब) बँड स्टँड बांधण्यासाठी लागणा-या निधीची उपलब्धता भाडेकरु संघाने करावी,

क) बँड स्टँड बांधून झाल्यानंतर त्याच्या देखभालीची सर्वस्वी जबाबदारी भाडेकरु संघाची राहील.

५) इ.क्र. ४३-५१, कामाठीपूरा, १०वी गल्ली, भूकर पाहणी क्र. ५१७, भायखळा, ई.विभाग हया इमारतींच्या संयुक्त पुनर्बांधणी योजनेस रक्कम रु. ९६,९०,७६५/- इतक्या रक्कमेस प्रशासकीय मंजूरी सर्वानुमते प्रदान करण्यात आली.

६) इ.क्र. १८, त्रिभूवन रोड, डी. विभाग, मुंबई हया पुनर्रचित इमारतीस "त्रिमूर्ती" हे नाव देण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

....

(ब) उपमुख्य अधिकारी (पु.गा.)

विषय- **मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या विक्री योजनेंतर्गत वितरण करण्यात आलेल्या गाळयांचे हस्तांतरण/नियमितीकरण करण्याबाबत.**

उपमुख्य अधिकारी/पु.गा. हयांनी याबाबत असे प्रतिपादन केले की, हा जो विषय सादर केला आहे त्यानुसार पुनर्रचित इमारतीतील १६६.०० चौ. फूटांचे जे गाळे त्यावेळी रिक्त असल्याने आम जनतेला विक्री करुन वितरीत करण्यात आले आहेत. हे गाळे जेव्हा वितरीत करण्यात आले होते त्यावेळी अशी अट घालण्यात आली होती की, हे गाळे संबंधित गाळेधारकांना ५ वर्षापर्यंत कोणालाही विकता येणार नाहीत. परंतू काही गाळेधारकांनी हे गाळे त्रयस्थ व्यक्तींना विकले आहेत. परंतु ५ वर्षाच्या अटीमुळे त्यांच्या हस्तांतरणास/नियमितीकरणास मान्यता देता येत नाही ज्यामुळे मंडळासही हया हस्तांतरणापोटी महसूल उत्पन्न हेत नाही. ज्याप्रकारे आपण इतर पुनर्रचित इमारतीतील गाळे हस्तांतरित/नियमित करतो त्याचप्रकारे हे गाळे हस्तांतरित/नियमित करण्याच्यादृष्टीने सदर ५ वर्षांची अट शिथिल करण्यास मंजूरी देण्याचा हा प्रस्ताव आहे.

सविस्तर चर्चेअंती हा प्रस्ताव प्राधिकरणापुढे सादर करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्याचे ठरले.

ठराव क्रमांक : ७८/६००

मंडळाने पुनर्रचित केलेल्या १६०.०० चौ.फू. क्षेत्रफळांच्या गाळयांचे हस्तांतरण/नियमितीकरण करण्याच्या दृष्टीने "हे गाळे ५ वर्षापर्यंत विकता येणार नाहीत" ही अट शिथिल करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

....

(क) विषयः- **मुंबई बेटावरील "अ" वर्गातील उपकरप्राप्त इमारतींच्या पुनर्विकासासाठी ना हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्याचे प्रस्ताव.**

मुंबई बेटावरील "अ" वर्गातील उपकरप्राप्त इमारतींच्या पुनर्विकासासाठी ना हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्याचे खालील ८ प्रस्ताव आयत्या वेळच्या विषयामध्ये मा. अध्यक्षांच्या परवानगीने मंजुरीसाठी सादर करण्यांत आले.

१. भुकर पहाणी क्र. २०२ डी/१०, माटुंगा विभाग, भूखंड क्र.२२७, दादर माटुंगा इस्टेट,उपकर क्र.एफ.एन ७०५८ (६) इ.क्र.६२५ई, सर भालचंद्र रोड, माटुंगा, मुंबई येथील **निशीत व्हिला** म्हणून ओळखल्या जाणा-या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता ''ना हरकत प्रमाणपत्र'' प्रदान करण्याबाबत.

२. भुकर पहाणी क्र.५२०, ५२१.१/५२१.२/५२१ व ३/५२१ गिरगांव विभाग, उपकर क्र. डी-९४६-४७,१२८६(१),१२८७(२),१२८८ व १२८७(१),१२८६(२-३),१२८७(३)इ.क्र.६,७,९,९ए, १२,

सदानंदवाडी व ३८-३६ सदाशिव स्ट्रीट मुंबई येथील सदानंदवाडी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता ''ना हरकत प्रमाणपत्र'' प्रदान करण्याबाबत.

३. अंतिम भूखंड क्र.६९४, नगररचना योजना क्र.४, माहिम विभाग, उपकर क्र.जीएन-४४०३ (३) इ.क्र. ६५, **रानडे रोड, दादर (प.)**, हया मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता ''ना हरकत प्रमाणपत्र'' प्रदान करण्याबाबत.

४. भुकर पहाणी क्र.१८७६ माहिम विभाग, भूखंड क्र. १६७ शिवाजी पार्क योजना, उपकर क्र. जीएन-४६९६(३) इ. क्र. ७ पांडुरंग नाईक मार्ग, शिवाजी पार्क, दादर, मुंबई येथील **''विशाल व्हिला''** म्हणून ओळखल्या जाणाऱ्या व सागरी विनियमांतर्गत आराखडयात (सी आर झेड) बाधित होणा-या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता ''ना हरकत प्रमाणपत्र'' प्रदान करण्याबाबत.

५. भुकर पहाणी क्र.७६१/१० व ७६२/१० माटुंगा विभाग, भूखंड क्र. ४७६ व ४७७ , दादर माटुंगा विभाग, उपकर क्र.एफ-७४१३ (१) व एफ-७४१५ (१) इ.क्र. ५ व ९८२ होरमासजी एडनवाला रोड, माटुंगा, मुंबई येथील **आफ्रिका हाऊस व राघदेव भूवन** म्हणून ओळखल्या जाणा-या मालमत्तेच्या एकत्रित पुनर्विकासाकरीता ''ना हरकत प्रमाणपत्र'' प्रदान करण्याबाबत.

६. भुकर पहाणी क्र.१९९४, भुलेश्वर विभाग, उपकर क्र.सी-४८४२-४३ इ.क्र. २५, नवीवाडी ,मुंबई येथील **लक्ष्मी बिल्डिंग/शिवशक्ती बिल्डिंग** म्हणून ओळखल्या जाणा-या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता ''ना हरकत प्रमाणपत्र'' प्रदान करण्याबाबत.

७. भुकर पहाणी क्र.११३, मलबार कंबाला हिल विभाग, उपकर क्र.डी-३०५६ (२), इ.क्र. ७०-ए, **बाणगंगा रोड, डी.विभाग**, मुंबई येथील सागरी किनारा नियंत्रण (कोस्टल रेग्युलेशन झोन) अंतर्गत बाधित मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता ''ना हरकत प्रमाणपत्र'' प्रदान करण्याबाबत.

वरील सर्व प्रस्तावांच्या अनुषंगाने मा. सभापती हयांनी असे प्रतिपादन केले की, हया सर्व प्रस्तावांमध्ये नियमाप्रमाणे ७० टक्के भाडेकरू / रहिवाश्यांची संमत्ती असून मालमत्ताधारक/ मुखत्यारपत्रधारक / विकासक हयांनी आवश्यक कागदपत्रांची पूर्तता केलेली आहे. क्षेत्रीय अधिका-यांनी रहिवाश्यांची यादी , त्यांच्या गाळयांचे क्षेत्रफळ, जुन्या इमारतींचे नकाशे तसेच अपरिवर्तनीय संमत्तीपत्रे तपासून प्रमाणित केलेली आहेत. त्यामुळे सदर प्रस्ताव, प्रस्तावात नमुद केलेल्या अटी व शर्तीवर ना हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्यास हरकत नसावी.

मुख्य अधिकारी हयांनी अ.क्र.६ वरील इ.क्र.२५, नवीवाडी हया प्रस्तावाच्या अनुषंगाने असे प्रतिपादन केले की, हया इमारतीची पुनर्रचना योजना मंडळाने हाती घेतली आहे. परंतु भूसंपादनाची कार्यवाही मालमत्ताधारकाने पुनर्विकासाचा प्रस्ताव सर्व रहिवाशांच्या संमतीने सादर केल्याने पूर्ण होऊ शकली नाही. त्यामुळे सदर प्रस्तावास ना.ह.प्र. प्रदान करण्यास हरकत नसावी.

सविस्तर चर्चेअंती मुंबई बेटावरील "अ" वर्गातील उपकरप्राप्त इमारतींच्या पुनर्विकासासाठी अ.क्र.१ते७ वर सादर केलेल्या प्रस्तावांना प्रस्तावात नमुद केलेल्या अटी व शर्तीच्या अधीन राहून ना हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्याचे ठरले.

ठराव क्रमांकः ७८/६०१

मुंबई बेटावरील "अ" वर्गातील उपकरप्राप्त इमारतींच्या पुनर्विकासासाठी मालमत्ताधारक/मुखत्यारपत्रधारक/विकासक हयांच्याकडून प्राप्त झालेल्या खालील ७ प्रस्तावांना प्रस्तावात नमूद केलेल्या अटी व शर्तींच्या आधीन राहून ना हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

१. भुकर पहाणी क्र. २०२ डी/१०, माटुंगा विभाग, भूखंड क्र.२२७, दादर माटुंगा इस्टेट,उपकर क्र.एफ,एन ७०५८ (६) इ.क्र.६२५ई, सर भालचंद्र रोड, माटुंगा, मुंबई येथील **निशीत व्हिला**
२. भुकर पहाणी क्र.५२०, ५२१,१/५२१,२/५२१ व ३/५२१ गिरगांव विभाग, उपकर क्र. डी-९४६-४७,१२८६ (१), १२८७ (२), १२८८ व १२८७ (१), १२८६ (२-३), १२८७ (३) इ.क्र.६,७,९,९-ए, १२, **सदानंदवाडी** व ३८-३६ सदाशिव स्ट्रीट मुंबई .
३. अंतिम भूखंड क्र.६९४, नगररचना योजना क्र.४, माहिम विभाग, उपकर क्र.जीएन-४४०३ (३) इ.क्र. ६५, **रानडे रोड, दादर (प.)**, मुंबई.
४. भुकर पहाणी क्र.१८७६ माहिम विभाग, भूखंड क्र. १६७ शिवाजी पार्क योजना, उपकर क्र. जीएन-४६९६ (३) इ. क्र. ७ पांडुरंग नाईक मार्ग, शिवाजी पार्क, दादर, मुंबई येथील **"विशाल व्हिला"** म्हणून ओळखल्या जाणाऱ्या व सागरी विनियमांतर्गत आराखडयात (सी आर झेड) बाधित होणारी मालमत्ता.
५. भुकर पहाणी क्र.७६१/१० व ७६२/१० माटुंगा विभाग, भूखंड क्र. ४७६ व ४७७ , दादर माटुंगा विभाग, उपकर क्र.एफ-७४१३ (१) व एफ-७४१५ (१) इ.क्र. ५ व ९८२ होरमासजी एडनवाला रोड, माटुंगा, मुंबई येथील **आफ्रिका हाऊस व राघदेव भूवन** म्हणून ओळखली जाणारी मालमत्ता.
६. भुकर पहाणी क्र.१९९४, भुलेश्वर विभाग, उपकर क्र.सी-४८४२-४३ इ.क्र. २५, नवीवाडी ,मुंबई येथील **लक्ष्मी बिल्डिंग/शिवशक्ती बिल्डिंग** म्हणून ओळखली जाणारी मालमत्ता.
७. भुकर पहाणी क्र.११३, मलबार कंबाला हिल विभाग, उपकर क्र.डी-३०५६ (२), इ.क्र. ७०-ए, **बाणगंगा रोड,** डी.विभाग, मुंबई येथील सागरी किनारा नियंत्रण (कोस्टल रेग्युलेशन झोन) अंतर्गत बाधित मालमत्ता.

तद्नंतर मा.सदस्य श्री. गजेंद्र लष्करी हयांनी अशी सूचना केली की, पावसाळा जवळ आला असल्याने ज्या ज्या ठिकाणी आपल्या मंडळाची दुरुस्तीची व पुनर्बांधणीची कामे सुरु आहेत त्या कामांच्या ठेकेदारांना घनकचरा (डेब्रिज) रस्त्यावर साचून न ठेवता त्वरित हलविण्याबाबत सूचना द्याव्यात. जेणेकरुन पावसाळयामध्ये पाणी तुंबण्याचे प्रकार होणार नाहीत.

मा.सदस्य श्री. गजेंद्र लष्करी हयांनी तद्नंतर अशीही सूचना केली की, पावसाळा जवळ आला असल्याने नियंत्रण कक्षासाठी असलेले वाहन चालू अवस्थेत राहील हयाबाबत संबंधितांनी काळजी घ्यावी जेणेकरुन नियत्रण कक्षात काम करणा-या अधिका-यांना आपात्कालिन जागेला त्वरित भेट देणे शक्य होईल. हया व्यतिरिक्त इतरही यंत्रसामुग्री जसे मोबाईल फोन वगैरेचीही सोय असावी.

नियंत्रण कक्षात मोबाईल फोन दिलेलाच आहे परंतु आपात्कालिन परिस्थिती त्वरित हाताळण्याच्या दृष्टीने नियंत्रण कक्ष अद्ययावत ठेवावा.

तदनंतर मा.सदस्य श्री. मोहन देसाई हयांनी अशी विचारणा केली की, एखाद्या इमारतीतील एका गाळयामध्ये एक रहिवाशी व एक पोट भाडेकरु रहात असल्यास मंडळ त्यांना म्हणजे रहिवाशाला व पोटभाडेकरुलाही पर्यायी जागा देते. मात्र एका रहिवाशाच्या जर एकाच इमारतीत दोन खोल्या असतील तर मंडळ मात्र एकच पर्यायी जागा देते. त्यामुळे हयाबाबत नेमकी पध्दत काय आहे ?

हयाबाबत उपमुख्य अभियंता (पुनर्रचना) हयांनी असा खुलासा केला की, एकाच रहिवाशाच्या दोन खोल्या असतील मात्र भाडे पावती जर एकच असेल तर त्याला एकच पर्यायी जागा दिली जाते. मात्र दोन खोल्यांसाठी जर स्वतंत्र भाडे पावत्या असतील तर दोन पर्यायी जागा दिल्या जातात.

मुख्य अधिकारी हयांनी हयाबाबत असे प्रतिपादन केले की, ज्या गाळयाला स्वतंत्र दरवाजा आहे व ज्यामध्ये स्वयंपाकाची व्यवस्था, न्हाणीघर आहे अशा गाळयास आपण परिपूर्ण किंवा स्वतंत्र गाळा म्हणतो ज्यामध्ये त्याचा वापर स्वतंत्र असतो. अशा स्वतंत्र गाळयामध्ये कितीही कुटुंबे रहात असली तरी तो एकच गाळा गणला जातो. त्यामुळे सदर गाळयापोटी एकच पर्यायी गाळा दिला जातो.

....

तदनंतर मा.सदस्य श्री. बाप्पा सावंत हयांनी असा मुद्दा उपस्थित केला की, मागील बैठकीत एका इमारतीमध्ये पंपमन रहात असलेल्या गाळयाबद्दल चर्चा झाली होती. त्यावेळी सदर पंपमनकडून हा गाळा खाली करुन घेण्याचे ठरले होते. परंतु सदर गाळा अद्याप खाली केला गेलेला नाही. हा गाळा कोणी खाली करावयाचा हयात अधिका-यांमध्ये आपापसात मतभेद आहेत.

का.अ.(पु.वि.१) हयांनी असा खुलासा केला की, सदर गाळा खाली करुन घेण्याचे काम हे मि.व्य.(पु.गा.) यांचे असून त्यांनी हा गाळा खाली करुन घेणे आवश्यक आहे. त्यानुसार मा.सभापती हयांनी मि.व्य.(पु.गा.) श्री. जगदाळे हयांना सदर गाळा त्वरित खाली करुन घेण्याचे आदेश दिले.

बैठकीच्या अखेरीस मा.सभापती हयांनी उपस्थित सर्व सन्मा.सदस्य, मंडळाचे अधिकारी व कर्मचारी वर्ग हयांचे आभार मानून आजची बैठक संपल्याचे जाहिर केले. तसेच मंडळाची पुढील बैठक दि.०३ जुलै २००२ रोजी दु.३.०० वाजता घेण्यात येईल असे जाहिर केले.

सचिव / मुं.इ.दु. व पु.मंडळ

मुख्य अधिकारी/मुं.इ.दु. व पु.मंडळ

मा.सभापती/मुं.इ.दु. व पु.मंडळ

परिशिष्ट - अ

मंडळाच्या दिनांक ४/६/२००२ रोजी झालेल्या ७८ व्या बैठकीत प्रशासकिय मंजूरी देण्यांत आलेल्या दक्षिण परिमंडळ अंदाजपत्रकांची यादी.

अ.क्र.	इमारतीचा तपशिल	दुरूस्तीचा टप्पा मंडळ/नाहप्र	मजल्यांची संख्या / भाडेकरूंची संख्या	इमारतीचे बांधकाम क्षेत्रफळ / दुरूस्तीचा दर	अंदाजपत्रकाची एकूण रक्कम	निव्वळ टप्प्याची रक्कम	रू.१०००/- प्रती चौ.मी. मर्यादेतील	रू.१०००/- प्रती चौ.मी. मर्यादेपेक्षा अधिक असलेली रक्कम	शेरा
१	२	३	४	५	६	७	८	९	१०
अ विभाग									
१.	९७-१०३ एम. जी. रोड	दुसरा / मंडळ	तळ + ३ / १ + ८ = ९	१०१२.६४ / ९९४.२०	१००६७६८.००	२४८७६८.००	२४८७६८.००	०	मंजूर
२.	२७ कफ परेड	तिसरा (सु) / मंडळ	तळ + १ / ४+ १ = ५	७७५.४२ / १००८.२५	७८१८२३.००	४४८३०९.००	४४१९११.००	६३९७.००	मंजूर
३.	७ सी, बॅरेक रोड	तिसरा / मंडळ	तळ + ४+ ५पार्ट / २४+ ९ = ३३	२१०८.०८ / ९८०.५९	२०६७१७१.००	५२७४२४.००	५२७४२४.००	०	मंजूर
ब विभाग									
४.	३३ उमरखाडी १ली क्रॉस लेन	तिसरा / मंडळ	तळ + ३ / १४ + ५ = १९	५५२.०० / ९८८.४८	५४५६४५.००	२३१९८०.००	२३१९८०.००	०	मंजूर
५.	१९३-१९७ शरीफ देवजी स्ट्रीट	चौथा / मंडळ	तळ + ४ / ३२ + २ = ३४	१३९६.५६ / ९८२.३४	१३७१९००.००	३३९५५५.००	३३९५५५.००	०	मंजूर
६.	२-८ पिंजारी स्ट्रीट	तिसरा / मंडळ	तळ + २ / ११ + ४ = १५	६५२.२९ / ९८५.९२	६४३१०८.००	३१७७६३.००	३१७७६३.००	०	मंजूर
७.	६८-७० भाजीपाला लेन	दुसरा / मंडळ	तळ + ४ / ९ + ६ = १५	५६५.४९ / ९८१.४४	५५४९९८.००	३६७५८७.००	३६७५८७.००	०	मंजूर
८.	२८ काझी सय्यद स्ट्रीट	दुसरा / मंडळ	तळ + २ व अशतः३ / ६ + ५ = ११	४५१.५७ / ९४९.७१	४२८८६२.००	२९३३९१.००	२९३३९१.००	०	मंजूर

२७७४७७७

९.	३९-४१ डॉ. महेश्वरी रोड (न्यु चिंचबंदर रोड)	दुसरा / मंडळ	तळ ± ३ / ३८ + १० = ४८	१६१०.३३ / ६८३.२६	११७६२८०.००	७७७६३०.००	७७७६३०.००	०	मंजूर
१०.	४ केशवजी नाईक रोड	चौथा / ना.ह.प्र	तळ ± ५ / १६ + १० = २६	१६४७.०८ / १६६०.३१	२७३४६६५.००	२२६५४९५.००	११७७९११.००	१०८७५८३.००	मंजूर
११.	२५ नाखुदा स्ट्रीट	पहिला/सु. / मंडळ	तळ ± ५± ६भाग / ५० + २८ = ७८	१०६४.६५ / ९५१.२२	१०१२७२२.००	१०१२७२२.००	१०१२७२२.००	०	मंजूर

सी १-२ विभाग

१२.	१४०-१५४ सी. पी. टॅंक रोड	दुसरा / मंडळ	तळ ± २ / १६ + १० = २६	८०४.८३ / ९६२.८३	७७४९१५.००	६६३९०४.००	६६३९०४.००	०	मंजूर
१३.	५८-६० बापू खोटे स्ट्रीट	चौथा / ना.ह.प्र	तळ ± ४ / ३४ +११ = ४५	१२०९.०० / ८३५.४९	१०१०११०.००	३७३६१०.००	३७३६१०.००	०	मंजूर
१४.	१४२ ई भुलेश्वर रोड	चौथा / मंडळ	तळ ± ३ / २३ +८ = ३१	८२०.०० / ९९५.१७	८१६०४१.००	४०६०४१.००	४०६०४१.००	०	मंजूर
१५.	४२-५४ दुर्गादेवी स्ट्रीट	तिसरा / मंडळ	तळ ± २ / १८ +६ = २४	७१६.२६ / ९८९.२९	७०८५८६.००	४६६६३४.००	४६६६३४.००	०	मंजूर
१६.	२५८-२६२ जंजीकर स्ट्रीट (ब्लॉक ४)	तिसरा/सु. / मंडळ	तळ ± ३ / २५ +८ = ३३	८२५.७५ / ५०३०.५७	४१५३९९५.००	३७४११२०.००	४१२८७५.००	३३२८२४५.००	मंजूर
१७.	१४८-१५० इरास्कीन रोड/ २९-३१ खोजा स्ट्रीट, क्रॉस लेन	दुसरा / ना.ह.प्र	तळ ± ३ / ७ + १४ = २१	७३९.०० / ८५४.४५	६३१४३७.००	४०९७३७.००	४०९७३७.००	०	मंजूर

सी ३-४ विभाग

१८.	११० कॅव्हल स्ट्रीट	चौथा / मंडळ	तळ ± ४ / ६ +३४ = ४०	१४२४.८६ / ९४३.३९	१३४४२०१.००	३६३०८४.००	३६३०८४.००	०	मंजूर
१९.	३६४-अे, जे. एस. एस. रोड	तिसरा / ना.ह.प्र.	तळ ±३ / २ + २ = ४	१३९९.०३ / ७३२.७१	१०२५०८७.००	४४४९२३.००	४४४९२३.००	०	मंजूर
२०.	१८-१८-डी, दुसरी फणसवाडी	तिसरा/सु. / मंडळ	तळ ± ४ / ४३ + २६ = ६९	२६६५.०४ / ९९४.५०	२६५०४०८.००	११८१७६५.००	११८१७६५.००	०	मंजूर
२१.	२३२ एल. टी. मार्ग	तिसरा/सु. / मंडळ	तळ ± ५ / २५ + २५ = ५०	१९४५.०० / ९६९.३७	१८८५४३७.००	१६५०७६३.००	१६५०७६३.००	०	मंजूर

१८५३२२०५

६९

२२.	८५-८७ विठ्ठल वाडी	दुसरा मंडळ	तळ ± ४ ४ +५ = ९	६७६.७६ ९७४.२६	६५९३४६.००	४५००१६.००	४५००१६.००	०	मंजूर
२३.	१०, दुसरी फणसवाडी	तिसरा ना.ह.प्र.	तळ ±३ १५ + ३ = १८	५२५.९६ ७५९.०१	३९९२१२.००	२४२८१२.००	२४२८१२.००	०	मंजूर
२४.	२५२ एल. टी. मार्ग	तिसरा/सु. मंडळ	तळ ± ४ १२ +११ = २३	४१६५.०० ९९१.१४	४१२८१३७.००	२५९०३९४.००	२५९०३९४.००	०	मंजूर
२५.	३८-४२ पोपटवाडी	तिसरा/सु. मंडळ	तळ ± ४ १८ + ११ = २९	९००.२० ९८४.८९	८८६६०१.००	५६३३५६.००	५६३३५६.००	०	मंजूर
२६.	१४० एन कॅव्हल क्रॉस लेन	चौथा मंडळ	तळ ± ३ ८ + १२ = २०	६२०.०० ९९६.८४	६१८०४३.००	१५५९८४.००	१५५९८४.००	०	मंजूर

डी-१ विभाग

२७.	१४९-एफ, जे. एस. एस. रोड	पांचवा मंडळ	तळ ±४ ३० +७ = ३७	१५९५.०० ९८२.११	१५६६४६९.००	२१६४६९.००	२१६४६९.००	०	मंजूर
२८.	२२-२४-२६, २६अे, ५६-ई तात्या घारपुरे पथ	तिसरा मंडळ	तळ ± १ १८ +६ = २४	८२४.५४ १०५८.१४	८७२३३२.००	४६२३३२.००	४१४३९२.००	४७९३९.००	मंजूर
२९.	३६- जे मुगभाट क्रॉस लेन	तिसरा मंडळ	तळ ± ३ १४ +१ = १५	४५७.५० ९६१.९५	४४००९४.००	२२६९९४.०	२२६९९४.०	०	मंजूर
३०.	१४ बी, खोताची वाडी	तिसरा मंडळ	तळ ±३ २७ + ० = २७	११८२.५० ९९९.९२	११८२४०२.००	२९५५२७.००	२९५५२७.००	०	मंजूर
३१.	२१६-२१८ खाडीलकर मार्ग, सरस्वती निवास	तिसरा मंडळ	तळ ±३ ३ +३ = ६	३३९.४८ १०६२.४०	३६०६६४.००	१००६६४.००	७९४८१.००	२११८४.००	मंजूर
३२.	१४६-१४८ विठ्ठलभाई पटेल रोड, प्रभु निवास	दुसरा ना.ह.प्र.	तळ ± ५ १७ +४ = २१	२८७५.६९ ५७०.९९	१६४१९९२.००	९७४६९३.००	९७४६९३.००	०	मंजूर
३३.	७ शेणवी वाडी	चौथा मंडळ	तळ ± १ १० +१ = ११	३०९.२५ ११९६.१४	३६९९०९.००	१५३६२२.००	९२९६६.००	६०६५६.००	मंजूर

८७०

५२

डी -२ विभाग

३४.	२५ अे, बाळाराम स्ट्रीट (जमाते सुलेमानी)	दुसरा / मंडळ	तळ + १ / ८ + १ = ९	११४६.५४ / ९९२.५६	११३८०१७.००	९७८०१७.००	९७८०१७.००	०	मंजूर
३५.	११ त्रिभुवन रोड (टीनवाला बिल्डींग)	तिसरा / मंडळ	तळ + ३ / २० + २० = ४०	११५७.११ / ९१२.५०	१०५६१३९.००	५९०५७४.००	५९०५७४.००	०	मंजूर
३६.	२७५-डी, जावजी दादाजी रोड, सुना बिल्डींग	तिसरा / मंडळ	तळ + ३ / १२ + १ = १३	१०२१.७२ / ९५२.३१	९७३००४.००	६०८१७९.००	६०८१७९.००	०	मंजूर
३७.	२७३ जावजी दादाजी रोड,	दुसरा / मंडळ	तळ + ३ / ८ + ० = ८	१०५०.०० / १०००.२३	१०५०२४२.००	१०००२४२.००	१००००००.००	२४२.००	मंजूर
३८.	३३-४३ पारेख स्ट्रीट	दुसरा/पु.सु. / मंडळ	तळ + ५ / १९ + १९ = ३८	३५६९.६३ / ९९९.८४	३५६९०६७.००	३१५३९१०.००	३१५३९१०.००	०	मंजूर
३९.	४१ भुलाभाई देसाई रोड	दुसरा/सु. / मंडळ	तळ + ५ / १३ + ० = १३	३५०९.६८ / ९८६.६८	३५०९६८०.००	३३१५४६४.००	३३१५४६४.००	०	मंजूर
४०.	३३ बाळाराम स्ट्रीट	तिसरा/सु. / मंडळ	तळ + ४ / १२ + ३ = १५	२१५०.०० / ९३१.२४	२००२१७०.००	१५७४६३५.००	१५७४६३५.००	०	मंजूर
४१.	४२३-सी, एम.एस. अली रोड, मोहनलाल मेहता बिल्डींग	चौथा / मंडळ	तळ + २ / १३ + १२ = २५	७३४.७६ / १०१६.९७	७४७२२९.००	२८६२२०.००	२७३७५१.००	१२४६९.००	मंजूर
४२.	३३ विल्सन स्ट्रीट	दुसरा / मंडळ	तळ + २+ ३पार्ट / २+ २= ४	२७२.३१ / ९९८.१५	२७१८०७.००	१८०४७०.००	१८०४७०.००	०	मंजूर
४३.	६ प्रॉक्टर रोड, पॅंडर हाऊस	दुसरा / मंडळ	तळ + २ / ५+ ० = ५	८०१.७१ / ९६८.३२	७७६३७३.००	४२२२२८.००	४२२२२८.००	०	मंजूर
४४.	२७५, क्यु. ताडदेव रोड	दुसरा/सु. / मंडळ	तळ + ३ / १०+ ० = १०	८२८.६४ / ९१६.६५	७५७५७४.००	६५७३९१.००	६५७३९१.००	०	मंजूर

3,57,32,398

५६

जावक क्रमांक: 9322
उ... अभियंता यांचे कार्यालय, उत्तर ...
... विभाग. ८, एस.
... निर्देशांक, दादर,
मुं.-४०० ०१४, दिनांक ६/६/02

परिशिष्ट "ब"

मंडळाच्या दिनांक ४/६/२००२ रोजी झालेल्या बैठकीत प्रशासकिय मंजूरी देण्यांत आलेल्या उत्तर परिमंडळातील अंदाजपत्रकाची यादी.

ई विभाग

अ.क्र	विभाग	वर्गवारी	इमारतीचे नांव	दुरुस्ती टप्पा --- मंडळ/ना.ह.प्र	मजले --- भाडेकरु नि+अनि=एकूण	क्षेत्रफळ चौ.मी. --- दर चौ.मी.चा खर्च	अंदाजपत्रकाची एकूण रक्कम --- निव्वळ टप्प्याची रक्कम	रु.१०००/-प्रति चौ.मी.मंजुरी करीता प्रस्तावित रक्कम	रु.१०००/- प्रति चौ.मी.जास्त असलेली रक्कम	शेरा
१.	२.	३.	४.	५.	६.	७.	८.	९.	१०.	११.
१.	ई	ब	४२, टँक स्ट्रीट, नागपाडा, मुंबई	तिसरा टप्पा मंडळ	तळ+ ३ १२ + १=१३	३४०.०० ९६२.५५	३२७२६८/- १६२७३९/-	१६२७३९/-	--	मंजूर
२.	-"-	अ	१०, स्टेबल स्ट्रीट, कामाठीपुरा, मुंबई	तिसरा टप्पा मंडळ	तळ + ३ २४ + ४ = २८	४४८.३४ ९४८.००	४२४९३१/- २४४१८४/-	२४४१८४/-	--	-"-
३.	-"-	-"-	३८, कामाठीपुरा, १४वी गल्ली, मुंबई	दुसरा टप्पा मंडळ	तळ +२ १८ +१ = १९	३९७.८७ १०३९.००	४१३३८४/- २७८३२३/-	२६२८०९/-	१५५१४/-	-"-
४.	-"-	-"-	३, घेलाबाई दुसरी गल्ली, (करिम बिल्डींग), मदनपुरा, मुंबई	चौथा टप्पा मंडळ	तळ + २ ७ + २ = ९	२३४.८८ १०३४.५०	२४२९८५/- ८२६३१/-	७४५२६/-	८१०५/-	-"-
५.	-"-	-"-	६९-बी, कच्छी लोहाणा चाळ, शिवदास चापशी मार्ग, माझगांव, मुंबई	दुसरा टप्पा मंडळ	तळ +२+३अंशतः ८५ + ७ = ९२	२८२१.८० ६०४.००	१७०३७०४/- ९३८५४२/-	९३८५४२/-	--	-"-
६.	-"-	-"-	२३, कामाठीपुरा, ५वी गल्ली, मुंबई	दुसरा टप्पा मंडळ	तळ + २ २२ + २ = २४	४८५.८९ ९५८.१९	४६५५७५/- २८४३९७/-	२८४३९७/-	--	-"-
७.	-"-	-"-	८-बी, व्हिक्टोरिया तिसरी क्रॉस गल्ली, भायखळा (पुर्व), मुंबई	ति.टप्पा सुधा. मंडळ	तळ + २ ६ + ० = ६	८३६.८२ ९१४.८०	७६७३६५/- ४६३२९३/-	४६३२९३/-	--	-"-
८.	-"-	-"-	४८-अे, सोफिया झुबेर रोड, नागपाडा, मुंबई	ति.टप्पा सुधा. मंडळ	तळ + ३ ८+० = ८	८९३.४६ ९६३.००	८६०३८५/- ८०८१८३/-	८०८१८३/-	--	-"-

1255

९६

१.	२.	३.	४.	५.	६.	७.	८.	९.	१०.	११.
९.	-"-	-"-	१७, केशवराव खाडये मार्ग, सातरस्ता, मुंबई	ति.टप्पा सुधा. मंडळ	तळ + ३ २३+७ = ३०	१२३७.२८ ९६९.८२	११९९९३७/- ६४५९६८/-	६४५९६८/-	--	-"-
१०.	-"-	-"-	९७-९७डी,रामभाऊ भोगले मार्ग, घोडपदेव, मुंबई	ति.टप्पा सुधा.मंडळ	तळ +२+३अंशतः ६०+३ = ६३	१३९१.२८ १००७.५१	१४०१७३८/- ७५३२६२/-	७४२८०४/-	१०४५८/-	-"-
११.	ई	अ	२७२-अे, बेलासिस रोड, आग्रीपाडा, मुंबई	पा.टप्पा सुधा. मंडळ	तळ +३ २६+३ = २९	१२३०.८७ ९३०.५९	११४५३५९/- ६६५०३३/-	६६५०३३/-		मंजूर
१२.	--"--	-"-	५८४-५८६, मयेकर बिल्डींग, ना.म.जोशी मार्ग,मुंबई	तिसरा टप्पा मंडळ	तळ +२ १५+२ = १७	४२२३.९० ९५२.००	४०३५२८/- १४२३२४/-	१४२३२४/-		--"--
							९३५६१५९/- ५४६८८७९/-	५४३४८०२/-	३४०७७/-	--"--

फ.ग.(द) विभाग

१.	२.	३.	४.	५.	६.	७.	८.	९.	१०.	११.
१.	फ.ग/द	अ	२८-२८अे, तोडीवाला बिल्डींग, सनमिल लेन, सिताराम जाधव मार्ग, लोअर परेल, मुंबई	चौथा टप्पा मंडळ	तळ + ३ २८ + ० = २८	१४३४.९७ ९८१.९२	१४०९०३७/- २९७८९०/-	२९७८९०/-	--	मंजूर
२.	-"-	-"-	जाम बिल्डींग क्र.३, डॉ.बी.ए.रोड, लालबाग, मुंबई	तिसरा टप्पा मंडळ	तळ+ ३ ६५+ ० = ६५	१२०८.६८ ९५७.९०	११५७७९५/- ७४६५३७/-	७४६५३७/-	--	-"-
३.	-"-	-"-	२५३-२५९, फिडवी मॅन्शन, डॉ.बी.ए.रोड, लालबाग, मुंबई	तिसरा टप्पा मंडळ	तळ + २ २१+ ७ =२८	१४७९.४९ ५२७.०५	७७९७७२/- ६२२९०६/-	६२२९०६/-	--	-"-

1515

५९

१.	२.	३.	४.	५.	६.	७.	८.	९.	१०.	११.
४.	-"-	-"-	१२६, सिंग इस्टेट, दादासाहेब फाळके मार्ग, दादर, मुंबई	दुसरा टप्पा मंडळ	तळ + १ ७ + ० = ७	७२३.१२ ७८३.७०	५६६७१३/- ४७९९३९/-	४७९९३९/-	--	-"-
५.	-"-	ब	१२२-सी, श्रीराम निवास, पाखारी लेन, वरळी गांव, मुंबई	दुसरा टप्पा मंडळ	तळ + १ ८ +० = ८	१४७.०० ९९१.९५	१४५८१७/- १११९८०/-	१११९८०/-	--	-"-
६.	-"-	अ	४०-४०बी, वीरदर्शन, (४०बी, गागजी चाळ), ग.द.आंबेकर मार्ग,मुंबई.	चौथा टप्पा मंडळ	तळ + १ १० + ५ = १५	३०७.०३ ९८१.५१	३०१३५६/- ७३६२३/-	७३६२३/-	--	-"-
७.	-"-	अ	९४-ओ-बी-सी, हाजी गुलमोहम्मद चाळ, शहिद अमरशेख मार्ग, मुंबई	चौथा टप्पा मंडळ	तळ + १ १०१ +० =१०१	१७१६.८६ ९८२.१५	१६८६२२३/- ४१५६९०/-	४१५६९०/-	--	मंजूर
८.	-"-	अ	२८४-२८६,तोडीवाला बिल्डींग, डॉ.बी.ए.रोड, लालबाग, मुंबई	चौथा टप्पा मंडळ	तळ + ३ १८ + ० = १८	१४४१.७९ ९८०.७२	१४१४००४/- ५६३५०४/-	५६३५०४/-	--	-"-
९.	-"-	ब	१०३-१०३अे, (१अे,१डी,१ई,१एच), मथुरादास हरीदास इमारत,डॉ.ई.मोझेस रोड, वरळी नाका,मुंबई	पहिला टप्पा मंडळ	तळ + १ ८ + ० = ८	११८३.८० ५००.०५	५९१९६५/- ५९१९६५/-	५९१९६५/-	--	-"-
							८०५२६८२/- ३९०३९५४/-	३९०३९५४/-		

फ.ग.(उ) विभाग

१.	२.	३.	४.	५.	६.	७.	८.	९.	१०.	११.
१.	फ.ग/उ	अ	२४७-जी, विजयकुमार जैन चाळ, भंडारकर वाडी, एल.जे.रोड,माहिम, मुंबई	दुसरा टप्पा मंडळ	तळमजला ६+ ० = ६	११४.०० ९५६.४३	१०९०३४/- ६९६७२/-	६९६७२/-	--	मंजूर

1678

१.	२.	३.	४.	५.	६.	७.	८.	९.	१०.	११.
२.	-"-	-"-	२७, ट्रिम्फा बिल्डींग, बालमिया लेन, माहिम, मुंबई	दुसरा टप्पा मंडळ	तळ+ ३ ८+ ० = ८	६०१.३६ ६११.१५	३६७५२६/- २७९५५४/-	२७९५५४/-	--	मंजूर
३.	-"-	ब	८, नारायण निवास, डी.एल.वैद्य रोड,दादर,मुंबई	तिसरा टप्पा मंडळ	तळ+३ ८ + ०=८	३८२.०० ९८३.३७	३७५६५१/- १५४५३९/-	१५४५३९/-	--	-"-
४.	-"-	अ व क	७७, कस्तुरबा बिल्डींग, भाऊ दाजी मार्ग, माटुंगा, मुंबई	दुसरा टप्पा मंडळ	तळ+ ३ २३+ ०= २३	७४७.१७ ७५५.६४	५६४५९५/- ४२४८४०/-	४२४८४०/-	--	-"-
५.	-"-	क	३८१-अे, मेडॉना बिल्डींग, एल.जे.रोड, माहिम, मुंबई	पहिला टप्पा मंडळ	तळ+ ३ ८ + ०= ८	४७४.६० ८८७.०५	४२०९९८/- ४२०९९८/-	४२०९९८/-	--	-"-
६.	-"-	अ	११, ग्रेगोरी हाऊस, गोखले रोड (दक्षिण),दादर,मुंबई	दुसरा टप्पा मंडळ	तळ+ २ ६+ ०= ६	५७३.०६ ९३०.४१	५३३१८१/- ३७८००४/-	३७८००४/-	--	-"-
७.	-"-	-"-	हेंन्द्रे कॅंस्ट्रल, गोखले रोड (उत्तर),दादर, मुंबई	प.सुधा टप्पा मंडळ	तळ+ २ २५+१४=३९	१४८९.९६ ८६७.२०	१२९२१०६/- १२९२१०६/-	१२९२१०६/-	--	-"-
८.	-"-	-"-	२, जोसेफ मेन्शन, कॉलेज लेन, दादर, मुंबई	पहिला टप्पा मंडळ	तळ+ २ ६+ ० = ६	७४०.८९ ९१२.१९	४२९५४५/- ४२९५४५/-	४२९५४५/-	--	-"-
९.	-"-	-"-	२४, चंद्रभागा भवन, डी. एल.वैद्य मार्ग, दादर, मुंबई	प.सुधा टप्पा मंडळ	तळ+ २ ११+०=११	५०७.७० १००३.३५	५०९४०२/- ५०९४०२/-	५०७७००/-	१७०२/-	-"-
१०.	-"-	-"-	२०३,अे-बी-सी, डर्बी मेन्शन, एल.जे.रोड, माहिम, मुंबई	ति.टप्पा सुधा मंडळ	तळ+ ४ २४+३=२७	११४६.३० ९९७.७४	११४३७१४/- ५७०५६४/-	५७०५६४/-	--	-"-
११.	-"-	क	२०, छोटालाल भवन, रोड क्र.१, किंग्ज सर्कल, माटुंगा	पहिला टप्पा मंडळ	तळ+ २+३ अंशतः ७+ ० = ७	४७५.६९ ५८०.७१	२७६२४०/- २७६२४०/-	२७६२४०/-	--	-"-
१२.	-"-	ब व क	१८९, एलसी व्हिला, रोड क्र.२५बी, सायन (पश्चिम), मुंबई	पहिला टप्पा मंडळ	तळ+ ३ ७ + ० = ७	६०७.०० ५५३.४६	३३५९५३/- ३३५९५३/-	३३५९५३/-	--	-"-
१३.	-"-	ब	४२७ शांतीनाथ भवन, डॉ.बी.ए.रोड, माटुंगा, मुंबई	दुसरा टप्पा ना.ह.प्र.	तळ+ ३ १० + १ = ११	४२०७.३९ ६२२.११	२६१७४५६/- २२११९८८/-	२२११९८८/-	--	-"-

१११

६३

१.	२.	३.	४.	५.	६.	७.	८.	९.	१०.	११.
१४.	-"-	ब व क	७०, मणी निवास, टी.एच.कटारिया मार्ग,माहिम, मुंबई	दु.टप्पा सुधा मंडळ	तळ+ ३ २३+०=२३	१४१९.११ ९५४.७१	१३५४८३८/- १२०९१०८/-	१२०९१०८/-	--	मंजूर
							१०३३०२३९/- ८५६१७१३/-	८५६००११/-	१७०२/-	

१९४

८६